# श्री साईलीला



मुंबईच्या डॉक्टरांना श्रीरामाच्या स्वरुपात बाबांचे दर्शन





नेकर रो

निकेतन

-१४ बुवारी )

किमत ६७ पैसे

( १

# अनुक्रमणिका – फेब्रुवारी १९७८


| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय – स. न. वि. वि. | — | भक्तिमार्ग म्हणजे काय ? |
| २) श्री. विश्वनाथ बाबा पिंगुळकर | — | सदानंद चेंदवणकर |
| ३) ब्रह्मीभूत श्रीसद् धोंडीराम महाराज | — | श्री. सुरेश सातपुते |
| ४) युगावतार श्रीसाईबाबा | — | श्री. चंद्रकांत सामंत |
| ५) संकीर्तनाचा परिणाम | — | डॉ. के. भ. गव्हाणकर |
| ६) शिरडीचे श्रीसाईबाबा | — | सदानंद |
| ७) श्रीसाई एक अवतार | — | सौ. सुनिता त्र्यं. चावक |
| ८) श्रीसाई एक अवतार | — | श्री. रा. के. काळे |
| ९) 'साई' शब्दाचा अर्थ | — | श्री विजय द. हजारे |
| १०) परम विचित्र उदी | — | सौ. शैला अंबाजी सरोदे |
| ११) साईनाथांनी महान् संकटातून सोडविले | — | श्री. वि. विजयकुमार |
| १२) मुंबई मराठी पत्रकार संघाची शिरडी भेट | — | ... |
| १३) शिरडीवृत्त | — | |
| १४) श्रीसाई प्रसन्न | — | सौ. मंदा खापरे |
| १५) अशी भेटे मुक्तिवाट | — | श्री. दिलीप द. जोशी |
| १६) साई मंदिरी फुलबाग | — | सौ. कलावती व. चव्हाण |
| १७) अजब शिरडी दरबार | — | श्री. एस्. एस्. स्वामी धरणीकर |
| १८) सद्गुरुकृपा | — | शशिकला साळगांवकर |
| १९) कृपावंत साई | — | एम्. के गुम्मलवार |
| २०) श्रीसाईनाथ प्रसन्न | — | पद्मावती के. चिटणवीस |
| २१) चला चला साईनाथाचे दर्शनाला | — | श्री. गं. म. जाधव |
| २२) श्री. साई महिमा | — | कु. शालिनी स. देशपांडे |
| २३) श्री. शिर्डीके साईबाबा प्रसन्न | — | श्री. अरुणकुमार सोनवणे |
| २४) वरदान | — | सौ. अस्मिता क. दांडेकर |


••••••••

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्रीसाई वाक्सुधा

जयजयाजी साई सद्गुरू ।
जयजयाजी सायुज्य कल्पतरू ।
जयजयाजी निजबोध सागरू ।
कथेसी आदरू उपजवीं ॥३॥

मेघोदकालागीं चातक ।
तैसे तव कथामृता भाविक ।
सेवोत तुझे भक्त सकळिक ।
पावोत सुख सर्वत्र ॥४॥

परिसतां तव कथा निर्मळ ।
स्वेद अंगी फुटो निखळ ।
नेत्रीं दाटो प्रेमजळ ।
प्राण पांगुळला राहो ॥५॥

मना येवो गहिंवर ।
रोमांच उठोत वरचेवर ।
रुदन स्फुंदन वारंवार ।
घडो सपरिवार श्रोतयां ॥६॥

तुटूनि जावोत परस्पर विरोध ।
सानथोर भेदाभेद ।
हाच गुरूकृपावबोध ।
करावा शोध अंतरीं ॥७॥

—श्रीसाईसच्चरित अध्याय २७ वा

# श्रीसाईलीला


[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५६ वे ] फेब्रुवारी १९७८ [ अं. ११



: संपादक :

श्री. का. सी. पाठक,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )



वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक ६० पैसे फक्त.



: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

## संपादकीय—

स. न. वि. वि.

# भक्तिमार्ग म्हणजे काय ?

● फार पुरातन काळापासून भक्तिमार्ग प्रचारात आला आहे. अलिकडे तर पाश्चात्य देशातसुद्धा आपल्या देवादिकाबद्दल प्रत्येक व्यक्ति आपल्या भक्तीचे, श्रद्धेचे कुतूहल करते.

प्राचीन काळातसुद्धा अनेक संतानी भक्तिमार्गाचा प्रसार करून आपल्या देवाबद्दल दृढ श्रद्धा, भावना आणि प्रेम निर्माण केले आहे.

सांप्रदायी वारकरी पंथातील संत शिरोमणी श्रीतुकाराम महाराज यांनी तर भगवंताबद्दल भक्तिमार्गाचा कळसच केला. संसारात राहूनच परोपकार, दया आणि ईश्वराबद्दलची अप्रतीम भक्ति निर्माण करून जगजागृती केली आहे. अनेक संकटांना तोंड दिले आहे. अनेक टीका सहन केल्या आणि देव आहे किंवा नाही अशा नास्तिक, दांभिक आणि ढोंगी जनतेपुढे श्रीतुकाराम महाराजांनी आपल्या श्रद्धेने आणि भावपूर्ण भक्तीने देवाबद्दलच्या भावना जनतेपुढे प्रगट केल्या आणि या त्यांच्या अढळ भक्तिवर आणि श्रद्धेवर अनेक भाविक श्रद्धाळू आणि सात्विक जनता आजही विश्वास ठेवून त्यांचा भक्तिमार्ग प्रज्वलित करीत आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज यांनी तर भक्तिमार्ग सांप्रदायी वर्गात अधिक वाढवून धार्मिक आणि सामाजिक फार मोठे कार्य केले आहे.

समाजातील भेद नाहीसे करून सर्वांना समान पातळीवर आणले. मोक्षाचा मार्ग सर्वांना खुला व सोपा करून दिला.

भक्तिमार्गाचे निरनिराळे पंथ आणि मार्ग संत शिरोमणी तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर महाराज यांनी जसे केले, तसेच बंगालमध्ये वैष्णव भक्तीचा प्रसार करणारे संत गौरांगप्रभू चैतन्य हे होय. हे कृष्ण भक्तीचे वेडे होते. कृष्ण कृष्ण करीत कृष्ण भक्तीच्या भरात त्यांना वारंवार मूर्च्छना येत असे.

भक्तिमार्गाचे सर्व श्रेय सांप्रदायातील सर्व साधु–संतानाच आहे. भक्त कबीर हे तर संसारिक संत होते. ते रामभक्त होते. राम-रहिम हे एकच आहेत. संत कबीर म्हणतात–हे प्रभो तू आमच्या जवळ आहेस ? प्रभूंनी त्यांना दृष्टान्तात येऊन सांगितले की, सेवका मला विनाकारण इकडे तिकडे का शोधतोस ? मी तुझ्याजवळच आहे. मी कुठल्याही तीर्थात नाही, देवळात नाही की मशिदीत नाही. हा कबीरांना

मिळालेला दृष्टान्त पुढे त्यांनी आपल्या अनेक रसामृत वाणीने अभंगातून आणि दोहऱ्यातून स्पष्ट केला आहे.

ईश्वराबद्दल भक्ति, श्रद्धा, भावना, प्रेम आणि आपुलकी असल्याशिवाय ईश्वराची प्राप्ती होत नाही. आत्मशांती मिळत नाही. संतांनीच म्हटले आहे की, "जो भक्तिचा जिव्हाळा तोचि देवांचा पुतळा" आणि म्हणूनच आजच्या काळा-तही भक्तिमार्ग हा लोकशाहीचाच एक पंथ आहे आणि मोक्षाचा मार्ग आहे.

परमेश्वर म्हणजे सर्व कल्याण गुणांचा समुच्चय. तसे त्याचे चिंतन करण्यानेही त्याची प्राप्ती होते.

ईश्वराजवळ गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, लहान-थोर असा भेद नाही. ईश्वर हा सर्वव्यापी आहे आणि सर्व साक्षी आहे.

ईश्वराची सेवा करून त्याची प्राप्ती मिळविण्याच्या दृष्टीने सर्व थरातील लोक भक्तिमार्गाने एकत्र होतात. म्हणूनच भक्तिमार्ग हा लोकशाही जागृतीचा पंथ आहे, आणि आजही लोकशाहीचेच सरकार आहे, आणि ते भक्तिमार्गाचाच अवलंब करून राष्ट्राची, देशाची आणि जनतेची सेवा मोठ्या भक्तिश्रद्धेने करीत आहे. भार-तावर आपले प्रेम, विश्वास आणि भक्तीचा जिव्हाळा असल्याशिवाय लोकशाहीचा स्वातंत्र्यरूपी एवढा मोठा भव्य तंबू आधारला गेला नाही, हे आपणास आजही स्पष्ट दिसत आहे.

कोणत्याही कार्याला मनापासूनची भक्ति आणि श्रद्धा असावी लागते. मग ती उशिरा का होईना फलद्रुप झाल्याशिवाय राहात नाही.

भक्तीचे जे अनेक मार्ग आहेत त्यातच जनसेवा हीच ईश्वर सेवा म्हणून घेणारे असेही काही सत्पुरुष आहेतच, आणि त्यांच्या सत्कार्याने हा देशव्यापी लोक-शाहीचा भव्य तंबू अजूनही फडफड करीत आहे. परंतु या तंबूत अनेक पंथाचे लोक आहेत. ज्यांना भक्ति नको असे अभक्त लोक नाहक त्या तंबूत बसल्या बसल्या अश्रद्धतेचे धडे सांगत आहेत. अशा ढोंगी, नास्तिक आणि पाखंडी लोकांना ईश्वर प्राप्ती कशी होईल?

तेव्हा आत्मविश्वास, आत्मशांती आणि सद्भावना त्यांच्यात निर्माण झाल्या-शिवाय त्यांना भक्तिमार्गाची गोडी चाखायला कशी मिळणार?

गाठीभेटी...२६

मुंबापुरीतील वयोवृद्ध साईभक्त

# श्रीविश्वनाथबाबा पिंगुळकर

-सदानंद चेंदवणकर
१२०।४०५५ टिळक नगर, चेंबूर ८९



❀ श्रीविश्वनाथबाबा पिंगुळकर ❀

* मुंबईमध्ये असलेल्या अनेक साईभक्तांमध्ये श्रीविश्वनाथबाबा पिंगुळकर हे एक निष्ठावंत साईभक्त म्हणून ओळखले जातात. आपल्या वडाळा येथील निवासस्थानी श्रीबाबांच्या तसविरीखाली बसून अडीअडचणीत सापडलेल्यांना मार्ग-दर्शन व दीनदु:खितांची सेवा करण्यात ते सतत दंग असतात. रविवारी तर त्यांच्या निवासस्थानी दर्शनेच्छूंची तर सकाळपासून रांगच लागलेली असते. पिंगुळकरबाबांचे एक स्वतंत्र मोठे एका खोलीएवढे देवघरच आहे. त्या खोलीत साऱ्या थोर संतांच्या, महात्म्यांच्या तसविरी व्यवस्थित लावलेल्या आहेत. त्या खोलीच्या चारी भिंती अशा तसबिरींनी गच्च भरलेल्या आहेत. पिंगुळकर बाबांचा दिवस पहाटे तीन वाजता उगवतो आपली नित्यप्रातः कामे आटोपून ते या देवघरात शिरतात तेव्हा चाराचे ठोके पडतात आणि बाबा एकांतवासात राहून या सर्व देवदेवतांची-संतांची पूजाअर्चा सुरू करतात. ते साईबाबांचे उपासकच आहेत व अचानक कधी मनात आले तर ते चटकन् वाटेल त्या मार्गाने शिरडीला जाऊन समाधीवर मस्तक ठेवून येतात.

पिंगुळकरबाबा हे मूळचे कोकणातील पिंगुळी जवळच्या खानोलीचे. त्यांच्या मातोश्रींचे नाव सीताबाई व पिताजींचे नाव तुकाराम. विश्वनाथबाबांच्या जन्माच्या वेळची एक आठवण सांगण्यासारखी आहे. त्यांच्या मातोश्री कोकणातील एक सत्-पुरुष श्री साटम महाराजांच्या दर्शनासाठी गेल्या होत्या परंतु त्यांना दर्शन लाभ काही झाला नाही आणि म्हणून निराश होऊन त्या स्वस्थ झोपी गेल्या. स्वप्नात दृष्टांत झाला की तुझ्या पोटी येणारे अपत्य हे पण मोठेपणी सत्पुरुष होणार आहे आणि हा दृष्टांत आज खरा ठरला आहे.

पिंगुळकरबाबा कराचीला होते. त्यांचे शिक्षण कराचीच्या एडवर्ड सॅक्सन मिडल-स्कूलमध्ये झाले आहे. भारताची दोन शकले जेव्हा झाली व निर्वासीतांचा प्रचंड लोंढा पाकमधून भारतात आला त्याबरोबरच १९४८ त ते मुंबईत अंगावरच्या कपड्या-निशी आले व स्थायिक झाले. सध्या ते बॉंबे पोर्ट ट्रस्ट मध्ये विद्युत विभागात जबाब-दारीचे कामकाज पहातात. पिंगुळकरबाबांचे वडील १९५७ साली स्वर्गवासी झाले. परंतु त्यांच्या मातोश्री हयात असून आज त्यांचे वय ८० चे घरात आहे. बाबांचा विवाह १९५३ साली झाला त्यांच्या पत्नी सौ. वनिता या पूर्वाश्रमीच्या बेळगावच्या कु. मालती शांताराम खानोलकर या होत. पिंगुळकर दांपत्यात विद्याधर, विजय, शेखर हे पुत्र व कु. सुनंदा ही कन्या अशी अपत्यसंपदा आहे. आपल्या चारही अपत्यांना त्यांनी व्यवस्थित शिक्षण दिले असून ही विसाव्या शतकात वावरणारी मुले पण सर्वधार्मिक संप्रदाय व रूढींचे पालन करतात. बाबांचे वडीलबंधू श्री. काशि-नाथराव हे पण बी. पी. टी. मध्ये इनस्पेक्टर या हुद्यावर आहेत.

श्रीपिंगुळकर बाबा गेली तीस वर्षांहून अधिक काळ श्रीसाईंची पूजा-अर्चा पाठ इ. करीत आहेत. श्रीसाईसच्चरित्राचे तर त्यांनी अनेकदा पारायण केले आहे. त्यांना लाभलेल्या दैवी शक्तिमुळेच की काय त्यांनी अनेकांचे संकट निवारण केलेले आहे, करीत आहेत. विशेषतः भूते-खेते तर क्षणात त्यांच्यापासून अजिबात दूरवर पळून जातात. त्यांच्या वाऱ्यालाही ती उभी राहात नाहीत. बाबांच्या देवघरात एक लहानशी हवनाची जागा आहे. बाबा त्यासमोर बसून ध्यानधारणा करतात. त्यांच्याकडच्या मंत्र सामर्थ्यामुळे अनेक कुटुंबांच्या व्याधी-विकार-पीडा-संकटे यांचे कायमचे हरण झालेले आहे. बाबा कोणत्याही प्रकारची कसलीच आर्थिक देवघेव-व्यवहार त्यांचेकडून करीत नाहीत. प्रसादासाठी आणलेली केळी पण ते स्वतःसाठी ठेवून घेत नाहीत. लगेच भक्तमंडळींना वाटून टाकतात. श्रीसाईबाबांच्यावर त्यांची अतीव श्रद्धा आहे. श्रद्धा आणि सबुरी या दोन शब्दांचे पालन जर साईभक्त करतील तर त्यांचे निःसंशय भले होईल असे त्यांचे सांगणे आहे. अलीकडील बहुतेक सर्व संतांच्या बरोबर काढलेली छायाचित्रे त्यांचे संग्रही आहेत.

श्रीपिंगुळकरबाबांच्या सारख्या निर्मोही व परोपकारी विभूतींना श्रीसाई उदंड सामर्थ्य, शक्ति व आयुरारोग्य देवो ही या प्रसंगी प्रार्थना. ●

### "इस्लामपुरचे अवधूत योगीराज"

# ब्रह्मीभूत श्रीमद् धोंडीराम महाराज

श्री. सुरेश सातपुते,
द्वारा : सातपुते स्टोअर्स,
जाम बिल्डींग, लालबाग, मुंबई नं. १२

* सांगलीहून रात्री निघालेला ट्रक बेफाम वेगात निघाला होता. दौलती एका हातात "पिवळा हत्ती" धरून दुसऱ्या हाताने सफाईने स्टीअरींग सावरीत होता. शेजारी क्लिनर धनू आरामात गाणे गुणगुणत ऐसपैस बसला होता. रस्ता नेहमीच्या सरावाचा असल्याने एकादया पोरानं पाठ केलेली उजळणी धाडधाड म्हणावी त्याप्रमाणे गाडी पळत होती. आष्टा नाका जवळ आला तसा धनू म्हणाला—

"दौलत्या, जरा बेतानं घे का ! आष्टा नाका जवळ आलाय नव्हं !" तसा मूडमध्ये आलेला दौलती खाऽडकन् भानावर आला, आणि क्लचवरचा पाय जोरात

दाबून त्याने फर्स्ट टाकला. त्यामुळे गाडीचा वेग अर्ध्यावर आला....नेहमीच्या संवयीने त्या अंधूक उजेडात, त्या दोघांचे डोळे रस्त्यावरच भिरभिरत कुणाला तरी शोधू लागले.

"धन्या, महाराज दिसत न्हायती रं कुठं ?"

"असत्याल... इकडं तिकडं कुनीकडं तरी ! आपलं तकदीर असलं तर दर्शन दिल्या बिगर -हानार न्हाईत बग !"

दौलतीनं एक्सलेटरवरचा पाय आणखीनच सैल केला. तशी गाडी मुंगीच्या पावलानं चालू लागली...हेतू हा की, महाराजांचा शोध नीट घेता यावा. एकाएकी धनू ओरडला,—

"आरं ! त्ये बग ! त्या झाडाखाली हुभं हाय ती !" त्यानं त्या अंधारातही ती परिचित आकृति ओळखली होती. दौलतीनं हेडलाईटस् "फुल" करून स्वतःची खात्री करून घेतली. एव्हाना ट्रक आकृतिपाशी पोहचलाच होता. दौलतीनं कचकन ब्रेक्स दाबले अन् एका बाजूनं टुणकन् खाली उडी मारली. धनूनंही त्याचच अनुकरण केलं.

एका झाडाला टेकून महाराज, एका पायावर उभे होते. हाताची बोटं एकात एक अडकवून दोन्ही हात डोक्यावर घेऊन त्यांनी समाधी साधलेली होती.

जमिनीवर असलेल्या त्यांच्या पायावर दौलतीनं अनेक लोटांगणे घातली. पाय दाबल्यासारखं करीत त्यांची अनेक चुंबनं घेतली, तशी महाराजांची तंद्री भंग पावली. ते भानावर येत म्हणाले...

"ए भाड्या ! जातोस का न्हाई आपल्या कामाला ?"

दौलतीने, महाराजांनी दिलेला तो सांकेतिक आशिर्वाद मनोमन जाणला. आपली ही फेरी महाराजांचे आशिर्वादाने आता सुखरूपच होणार याची त्याला खात्री होती. तो परतला....

इस्लामपूर हे सांगली—कऱ्हाड या मार्गावरील एक छोटेसे गाव आहे. या रस्त्यावरून जाणाऱ्या प्रत्येक ड्रायव्हरला महाराजांबद्दल माहिती होती...महाराज पेठ नाक्यापासून ते आष्टा नाक्यापर्यंत चार, पाच मैलाच्या परिसरात कुठंही पडलेले असतील. हे त्यांना माहीत असायचं. त्यामुळं हे दोन्ही नाके जवळ आले म्हणजे ड्रायव्हर लोक आपल्या गाडीचा वेग कमालीचा कमी करीत, आणि त्यांची ती खबरदारी योग्यच होती. कारण महाराज बहुधा रस्त्याच्या मधोमधच कुठंतरी बसलेले आढळायचे. कधी कधी रस्त्यातच ताणून दिलेली असायची. बरे, हॉर्नचा कितीही ठणठणपाळ केला तरी स्वारी तसूभर हालेल तर शप्पथ ! शेवटी हॉर्न वाजविणाराच

थकायच्या ! हीदेखील गोष्ट परिचयाचीच असल्याने ड्रायव्हर्स बहुधा बाजूनेच गाडी काढून निघून जात. कधी कधी भरधाव जाणाऱ्या गाडीच्या पुढेच महाराज अचानक दत्त म्हणून उभे राहत. मग ड्रायव्हरला थांबणेच भाग पडे.

महाराजांनी आष्टा नाक्यावरच्या रस्त्यावरच आपले आयुष्य घालविले. असे म्हटले तरी चालेल. उन्हा तान्हात...रात्री अपरात्री महाराज एका पायावर झाडास टेकून कुठंतरी उभे राहत. देह बुद्धीच नष्ट झाल्याने उन...पाऊस...वारा यांची जाणीव त्या देहाच्या ठायी कधीच नसे. भरपूर उंच आकृति...अतिशय बळकट शरीरयष्टी त्यामुळे महाराजांचे शरीर जणू पोलादाप्रमाणे भासे. आंघोळ तर कधीच नाही...पावसाचे पाणी अंगावर पडेल तीच काय ती आंघोळ. उन्मनी स्थितीतच सदैव असल्याने मलमूत्र विसर्जनाचीही क्षीति त्यांना नव्हती. पण तरीही—कधी दुर्गंधी सुटत नसे.

१९६७ च्या डिसेंबर महिन्यातील गोष्ट. महाराज हातात एक काठी घेऊन पाच, सहा दिवस जमिनीस झोडपत होते. लोकांना ह्या विचित्र कृतीचा अर्थच लागत नव्हता. अखेरीस राहवेना म्हणून एकाने विचारलेच—"महाराज हे काय चाललंय ?" तसे महाराज ताडकन् उत्तरले—

"भाड्या, तुला काय कळतंय ? ही फाटली तर मरालना ! "

त्यावेळी कुणाच्याही लक्षात या बोलण्याचा अर्थ आलाच नाही. पण—बरोबर बारा डिसेंबर एकोणीसचे सदुसष्टलाच कोयना भूकंपाचे हादरे बसले.

* * *

महाराज इस्लामपुरीच वाढलेले... बायकामुलांसह ते इस्लामपूरातच राहत होते. पण लहानपणापासूनच त्यांना ढोलकी वाजविण्याचे फार वेड ! भजनात, किर्तनात महाराज भजनाटपैकी ढोलकी वाजवित. या वेडापायी ते पंधरा—पंधरा दिवस, कधी कधी महिनाभरही घरी फिरकत नसत. एकदा ग्वाल्हेरचे एक सुप्रसिद्ध कीर्तनकार इस्लामपुरी आले... पण त्यांचा नेहमीचा ढोलकीवादक त्यावेळी त्यांच्याबरोबर नव्हता त्यामुळे त्यांचे कीर्तन काही हवे तसे रंगेना, तेव्हा ते सहज बोलून गेले, माझा नेहमीचा ढोलकीवादक असता तर...हे ऐकून किर्तनात बसलेले महाराज उठले व म्हणाले—

"आम्ही पाहू का ? वाजवायला येत का ते ? "

आणि महाराजांनी मृदूंग गळ्यात अडकवला. आणि अशी काही धमाल उडवून दिली की, किर्तनकार बेहद्द खुष झाले. पुढे महाराज त्यांच्या बरोबरच काहीकाळ प्रवास करीत होते. घरादाराकडे त्यामुळे त्यांचे पूर्णतः दुर्लक्ष झाले होते.

इकडे बायका मुलांचे हाल होऊ लागले.... अन्नपाण्यावाचून तळमळून कासाविस होऊ लागले. अखेर बायको कंटाळली अन् एके दिवशी वैतागून तिने घर सोडले आणि तडक माहेर गाठले.

पुढे महाराजांचे व कीर्तनकारांचे काही बिनसले व त्यामुळे ते घरी परत आले. पहातात तो काय ! घरी कुणीच नाही. महाराजांनी ओळखले. तेही तडक बायकोच्या माहेरी पोहचले. बायकोचा पारा चढलेलाच होता. महाराजांना पहाताच ती ओरडलीच—

"कशाला आलास ! बायका पोरांची लई काळजी करतोस ! किती दिस आमी उपाशी ऱ्हायचं ? त्यापक्षी जाईनास का गोसावी बनून... "

झाले—त्या कठोर शब्दांनी महाराज भोवतालीचे माता भगवती मायादेवीचे पाश भंगले.... "मी" "माझे" हा भ्रम सुटला....स्वप्नातून जागे व्हावे त्या-प्रमाणेच ते विश्वस्वप्नातून ताबकन् भानावर आले. क्षणार्धात निर्णय झाला, आणि महाराजांनी संसाररुपी घराचा उंबरठा ओलांडला तो कायमचाच ! त्यानंतरच्या आठ-दहा वर्षात महाराज कुणालाच दिसले नाहीत...

आठ, दहा वर्षांनंतर मात्र महाराजांनी "स्वयंभू" स्थितीतच इस्लामपूरात पुर्नप्रवेश केला. त्यावेळी त्यांच्या कमरेस एकमात्र गोणपाट होते...तेही काही वर्षांनी पुढे गळून पडले...

* * *

महाराज आष्टा नाक्यावरील ऑक्ट्राय चौकीत बसलेले असत...एखादा गाणे बजावणेवाला रस्त्यातून जात असला म्हणजे महाराज त्यास हाक मारीत—

"ए ऽ ऽ भाड्या ! हिकडं ये !"

साहजिक त्यास जवळ येणं भाग पडे. मग महाराज म्हणत...

"ए भाड्या ! बस हियं ! काय ते तुज वाजीव !"

मग तो वाजवू लागे. पण महाराज स्वतः यातले दर्दी होते. चांगला वादक सापडला तर त्याची रात्र रात्र सुटकाच होत नसे आणि त्याच्या बरोबर महाराज स्वतःही रंगत...डोलू लागत.

* * *

प्रत्येकाचे ऋणानुबंध असतात...तसे संताशीही काही ऋणानुबंध असावे लागतात. त्याखेरीज संत शक्तिपात करीत नाहीत. पण असे ऋणानुबंध नसतील तर संत भक्तास त्याचे ऋणानुबंध असणाऱ्या योग्य त्या अधिकारी सत्पुरुषाकडे पाठ-वितात...एकदा एक सुप्रसिद्ध फलज्योतिषी व हस्तरेषाविषारद मुमुक्षू श्रीमद्

धोंडीराम महाराजांकडे गेले. त्यांनी महाराजांच्या पायास स्पर्श करताच महाराजांनी त्यांची शर्टाची कॉलरच पकडली व त्यांना उठवत म्हणाले—

" भाड्या ! इकडे तिकिडे करतो. कोकणातील बामनाकडे जा ! "

हे शब्द म्हणजे ज्योतिषी महाशयांना पावसच्या श्रीमद्‌स्वरुपानंदांकडे जाण्याची आज्ञा होती. त्याप्रमाणे ते पावसला गेले. त्याच भेटीत श्रीस्वरूपानंदानी त्यांना अनुग्रह दिला आणि पुढे त्यांची अध्यात्मात बरीच प्रगती झाली हे काय सांगायला हवे?

महाराज नेहमी तुटक बोलत. सहसा सामान्य माणसास, त्याचा संदर्भ लागणे कठीण पडे. परंतु त्यांच्या ह्या तुटक शब्दात फार मोठा अर्थ भरलेला असे. दर्शनास जाणाऱ्यास त्यांना कधीच काहीही सांगावे लागत नसे. आमचे इस्लामपुरी राहणारे एक परम मित्र आहेत. मॅट्रीक पास होण्याच्या सुमाराला ते रोजच्याप्रमाणे महाराजांच्या दर्शनास गेले. त्यांनी जाताना काही केळी नेली होती. हातातील केळी पाहून महाराज स्वतःच म्हणाले —

"ए ! त्यातले एक दे ! "

त्यांनी केळ देताच त्यांच्या डोक्यात टपली मारून म्हणाले, " ए पळ, तुझं काम झालं ! "

आणि दुसरे दिवशीच आमच्या मित्रवर्यांना याचा प्रत्यय आला. मॅट्रीकचा रिझल्ट लागून त्यात ते पास झाले होते व त्यांना नोकरीचे अपॉईन्टमेंट लेटर काही दिवसातच मिळाले.

* * *

महाराज भरपूर उंच, लोखंडाच्या कांबीसारखे खणखणीत शरीर, डोक्यावर पिंजारलेल्या जटा त्यामुळे त्यांचे दर्शन बिन सरावाच्या माणसास थोडे भयप्रद वाटे. त्यातून रात्री अपरात्री अंधारातही ते कुठेही उभे असत. अन् जाणाऱ्या येणाराची अकस्मात दृष्टी पडताच त्याची क्षणभर का होईना पाचावर धारणच असे. माणसांची ही कथा तर जनावरांचे काय सांगावे ?

एका संध्याकाळी एक गाडीवान घरी परतत होता. प्रकाश केवळ नावालाच उरला होता. इतक्यात महाराज दत्त म्हणुन गाडीच्या समोर उभे ठाकले. झाले— महाराज अचानकच समोर आल्यामुळे, ते अजस्त्र शरीर पाहून बैल बुजला आणि वेसणीला हिसके मारू लागला. ते पाहून गाडीवानाचे डोकेच सणकले. झाले ! त्याने चिडूनच हातातील चाबुकाचा फटकारा महाराजांच्या अंगावर ओढला. आता, विदेही स्थितीतील संतास त्याने काय होणार ?

पण—घरापर्यंत पोहचताच बैलाने जमिनीवर अंग टाकले ते कायमचेच! आणि चाबकाच्या फटकाऱ्याचा एक लांबच लांब वळ बैलाच्या अंगावर आढळला...

एक टुरींग भरधाव वेगात धावत होती. इस्लामपुरचा एस. टी स्टँण्ड तिने सफाईने वळण घेत पास केला, आणि सांगलीच्या दिशेने ती धावू लागली. वेळ सुमारे पावणे अकरा...मोटारीच्या मालकास अकरा वाजता सांगली कोर्टात हजर व्हायचे होते. त्यामुळे एकादं कुत्रं पाठीशी लागावं त्याप्रमाणे मोटार भन्नाट धावत होती. आणि ड्रायव्हरने कचकन् ब्रेक्स दाबले. कारण महाराज वाट अडवून मध्येच उभे होते.——

"ए ऽ ऽ चल परत मुंबईला!" महाराज म्हणाले.

पुढे बोलण्याचा काहीच उपयोग नव्हता. मालक मुकाट्याने परत फिरला. दोन दिवसानंतर त्याला मुंबईतच कळले की केसचा निकाल त्याच्या बाजूनेच झाला होता. तो लगेच करंडेच्या करंडे भरून मेवामिठाई, फळे, हार, तुरे इत्यादी घेऊन महाराजांच्या भेटीस तातडीने आला...

पण महाराज यातील कुठल्याही वस्तूस शिवलेदेखील नाहीत.

*　*　*

महाराजांचे वास्तव्य १९४८ सालपर्यंत पुणे-कोल्हापूर मार्गावरील पेठ नाक्यावरच होते. सांगली जिल्ह्यात, सुप्रसिद्ध बत्तीस शिराळ्याजवळ (नागपंचमी फेम) श्रीमद् गोरक्षनाथांचा मठ आहे. तेथे काही नाथपंथी साधक-संन्यासी नेहमी जात असत. पुणे-कोल्हापूर मार्ग सोडून सांगली रस्त्यास लागले म्हणजे याच रस्त्यावर दोन मैलावर इस्लामपूर लागते. त्यामुळे मार्गस्थ अशा संन्याशांच्या झुंडीच्या झुंडी महाराजांच्या दरबारात हजेरी लावीत. त्यावेळी एक गमतीचा प्रकार घडे. महाराज ह्या सर्व संन्याशांना फलटणीतील सैनिकाप्रमाणे लायनीत उभे करीत व एखाद्या कर्नल प्रमाणे जवळ जावून एकेकाचे निरीक्षण करीत.

*　*　*

'हे विश्वची माझे घर!' या उक्तीप्रमाणे संतांची वर्तणूक असते. महाराजही त्याला अपवाद नव्हते. मनात आले तर—जाणाऱ्या येणाऱ्यास हटकून त्याच्याकडील भाकरी महाराज मागून घेत, आणि तिथेच रस्त्यावरच ठेऊन ती खात. जणू रस्ता म्हणजेच त्यांचे ताटही होते! तसेच कोणाच्याही दाराबाहेर ठेवलेल्या रांजणातून ते पाणी उपशीत व घटाघटा पिऊन टाकीत.

महाराज जेव्हा रस्त्यावर नसत तेव्हा आष्टा नाक्यावर असलेल्या ऑक्ट्राय चौकीत ते बसत. लांबलांबहून भक्त तिथे त्यांच्या भेटीला येत. कुणी फळं आणी,

कुणी फुलं आणी. पण मनात आले तरच त्याचा स्वीकार होई. काही भक्त मोठ्या प्रेमाने त्यांचे पाय दाबित बसत. अशा वेळी त्यांच्या अवधूत लीलाही पहाण्यासारख्या असत. कधी कधी मध्येच उठून ते नाचू लागत, तर कधी एखाद्या मल्लाप्रमाणे जोरजोरात दंड थोपटीत. त्यावेळी दोन-चार मल्लांनी एकदम दंड थोपटावेत असा आवाज होई. कधी कधी महाराज अचानक भाव समाधीत जात. व "मी गोरक्ष आहे...मी संभूआप्पा आहे" असे म्हणत. एकादा लबाड माणूस भेटीस आला की, ते "करावं तसं भरावं" असं काहीतरी म्हणत. मग तो माणूस मनातल्या मनातच समजून जाई व चालू लागे.

महाराज इथं तिथं बसतात म्हणून एका भक्ताने मोठ्या हौसेने त्यांच्यासाठी एक आरामशीर खुर्ची एकदा आणली. पण महाराजांनी स्वतःच्या हयातीत तिचा स्वीकार कधी केलाच नाही. ती खुर्ची अजूनही आष्टा नाक्यावरील त्या ऑक्ट्राय चौकीत पडून आहे. मात्र आज तिच्यावर महाराजांचा एक मोठा फोटो ठेवलेला आहे. अखेरीस चैतन्य रुपाने का होईना, महाराजांनी तिचा स्वीकार केलाच. असे असतात संत !

* * *

योग्यांस तिन्ही त्रिकालाचे ज्ञान असते. मग महाराज तर अवधूत अवस्थेत होते. त्यांना काय अशक्य ? वर उल्लेख केलेले ज्योतिर्विद एकदा पुण्यास निघाले होते. रस्ता इस्लामपुराहूनच जात असल्याने ते जाता जाता मध्येच उतरून महाराजांच्या भेटीस गेले. नमस्कार वगैरे आटोपल्यावर महाराज विचारतात– "कुठे निघालास ?" त्यांनी अर्थातच पुण्यास जात असल्याचे सांगितले. त्यावर महाराज उत्तरले–

"पून्याची बामनं वाहून गेली बघ–"

नंतर ज्योतिर्विद पुण्यास गेले. व तेथून मुंबईस आले. आणि १२ जुलै १९६१ रोजी पानशेतचे धरण फुटल्याची वार्ता आली. त्यावेळी खरोखरीच कित्येक जीव त्या पाण्यात बुडून मृत्यूमूखी पडले.

अशा रितीने महाराजांची ती वाणी सत्य ठरली.

* * *

उगवलेला सूर्य वेळ संपताच अस्ताला जातो.

महाराजांचे अखेरचे दिवस आले. सन १९७० एप्रिल महिना निमित्त म्हणून की काय, महाराजांच्या टाचेस काही-बाही लागून जखम झाली. ती काही केल्या बरीच होईना. वास्तविक एवढ्या अजस्त्र देहास एवढ्याश्या जखमेचे ते काय ! पण नाही. तसे व्हायचे नव्हते. डॉक्टर नियमाने येत. मलमपट्टी करीत, औषधपाणी देत.

महाराजही सर्वांच्या समाधानासाठी ते सर्व सोपस्कार करून घेत. पण म्हणत—

"हे असलं लावून कुठं बरं व्हतय व्हय ते !"

आणि ह्या मामुली दुखण्यातच महाराजांनी चैत्र कृष्ण अष्टमी तारीख २९ एप्रिल १९७० रोजी दिव्य समाधी साधली. आता याच दिवशी दरवर्षी तेथे भंडारा होतो. महाराजांनी समाधी साधली तीसुद्धा जाता जाता एक चमत्कार दाखवूनच ! त्याचे असे झाले— महाराजांचे काही अति प्रिय भक्त फलटण येथे होते. महाराजांनी इस्लामपुरात चारच्या सुमारास देह ठेवला. पण दुपारी दोनच्या आधीच फलटण येथील एका भक्तास दृष्टांत झाला. त्यात महाराजांनी "मी निघालोय" असा इषारा दिला. मग काय विचारता ? त्याने इतर भक्त मंडळीस ही बातमी कळवून त्यांना पटापट एकत्र केले व स्पेशल गाडी करून ते इस्लामपुरी निघाले. सायंकाळी इकडे, महाराजांनी देहत्याग केल्यानंतर तेथील भक्तानी तात्ङतोब फलटण येथे ट्रंककॉल लावला व तेथील भक्तांना त्वरित पाठविण्यास सांगितले पण फलटण येथे कॉल घेणाऱ्याने उत्तर दिले–ते केव्हाच येथून निघालेले आहेत. इतक्यात ते लोक तेथे पोहचतीलच.

रात्रौ महायात्रा मोठ्या थाटातच निघाली. तेव्हा आठ-आठ, दहा-दहा लोकांनाही तो प्रचंड देह पेलवत नव्हता. संपूर्ण गावातून फिरून मिरवणूक आष्टा नाक्यावर आली. चौकीच्या मागचीच जागा महाराजांनी "माझी" म्हणून जिवंतपणीच घोषित केले होते. तिथेच त्यांना रातोरात दिव्य समाधी देण्यात आली. सुमारे बारा बाय आठ फुट अशी लांबरुंद ही समाधी आहे. वर साधाच असा तांबड्या रंगाचा कोबा केलेला आहे. तिथं सगळंच कसं अगदी साधं भादं आहे. कसलाही थाटमाट नाही. ही आजची परिस्थिती आहे. पुढे काय होणार आहे ते स्वतः महाराजच जाणोत !

आजही जाणारे येणारे तिथे काही क्षण थांबतात...विसावतात आणि स्वानुभवाचे गाठोडे घेऊन जातात !

[ इस्लामपूरचे रहिवासी व आमचे परम मित्र श्री. राजारामबापू खटावकर यांची हा लेख लिहिण्यास फारच मदत झाली त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. ]

॥ श्रीसाईनाथार्पणमस्तु ॥

॥ जय सद्गुरु धोंडीराम महाराज ॥

# युगावतार श्रीसाईबाबा : १२

## (श्रीसाईबाबा सत्संग मंडळ, सुरत ह्यांच्या सौजन्याने)

अनुवादक :– श्री. चंद्रकांत दामोदर सामंत,

डोंगरे मॅन्शन, ताडदेव, मुंबई ४००००७

* श्रीसाईबाबांच्या शिरडी येथील वास्तव्यात त्यांच्या भक्तांना त्यांच्या कृपेचे जे जे अनुभव येत होते, तशाच प्रकारची प्रचिती त्यांच्या महासमाधिनंतर अद्यापही वारंवार येत असते. संकटात सापडलेल्या भक्तांना भयमुक्त करण्यासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या श्रीबाबा त्वरित धावून येतात हा आजवरचा अनुभव आहे.

१९२६-२७ सालची गोष्ट आहे ही. शिरडी येथील रामनवमीचा उत्सव आटोपून अनेक भक्तमंडळी मुंबईला आगगाडीने परतत होती. गाडी ठाणे स्थानकावर थांबताक्षणी त्यापैकी एक स्त्री पाणी पिण्यासाठी फलाटावर उतरली व डब्याकडे परतताना पाण्याने भरलेले भांडे हातात घेऊन तिने डब्यात चढण्यासाठी डब्याच्या फळीवर पाय टेकला, तोच गाडी सुटली. आकस्मिक बसलेल्या धक्क्यामुळे त्या स्त्रीचा तोल गेला व गाडी आणि फलाट ह्यांच्यामधील फटीत ती पडली. डब्यात बसलेल्या तिच्या यजमानांनी व इतर प्रवाश्यांनी साखळी खेचून गाडी थांबविण्याचा प्रयत्न केला, पण तोपर्यंत गाडी बरीच दूर गेली होती. गाडी थांबल्यानंतर भांबावलेल्या मनःस्थितीत गाडीतील ते सहप्रवासी ती स्त्री पडली होती त्या जागी धावतच पोहोचले. बहुतेक त्या स्त्रीचे शरीर गाडीखाली चिरडले असणार व आता केवळ तिचे प्रेतच दृष्टीस पडणार अशी बहुतेकांची अटकळ होती. पण पाहतात तो काय, गर्दीच्या मधोमध ती स्त्री जशीच्या तशी उभी होती. मोठ्या कृतज्ञतेने तिने सर्वांना सांगितले, मी पडले त्यावेळी खूप घाबरले होते, पण लगेच मनोमन श्रीबाबांचा धावा केला. त्याक्षणी जणू श्रीसाईबाबा माझ्या जवळ आले व त्यांनी मला फलाटाच्या बाजूले दाबून धरले व माझ्या शरीराच्या कोणत्याही भागाला गाडीचा जरासुद्धा स्पर्श झाला नाही. मी वाचले ही केवळ श्रीबाबांची कृपा.''

वास्तविक पाहता, फलाट व गाडी ह्या दोहोंच्यामधे इतकी अरुंद जागा असते की चालू गाडीच्या झपाट्यात सहसा एखादी व्यक्ति वाचणे म्हणजे एक अशक्यकोटीतील वाटणारी गोष्ट होय. परंतु सूक्ष्मरुप धारण करून किंवा अदृश्य रितीने भक्तांचे रक्षण करणे हे श्रीबाबांसारख्या अवतारी पुरुषाला मुळीच अवघड नाही.

वरील दृष्टांतावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, सद्‌गुरुचे कार्य महान् व जोखमीचे असते. भक्ताने केवळ स्मरण करण्याचाच अवकाश, सद्‌गुरुला त्याच्या मदतीला धावून जाणे भाग पडते. जितकी भक्तीची तीव्रता अधिक, तितकी सद्‌गुरुची भक्ता-विषयीची ओढ जास्त हे वेगळे सांगणे नकोच !

# संकीर्तनाचा परिणाम

— डॉ. के. भ. गव्हाणकर,
इंदिरा निवास, आग्रा रोड, कुर्ला

● महान भगवत्‌भक्त संत निष्ठावंत असतात. त्यांनाच सत्यस्वरूपाची प्रीति असते, बाकीच्यांना देव ठाऊक नाही व धर्म ठाऊक नाही. सकल देवांचे जीवित काय आहे हे माहीत नाही. त्रिभुवनातले देव जिवंत कशाने, जीव कशाने हा विचार आला नाही; ते जन केवळ निरुपयोगी म्हणजे उपयोगाकडे दृष्टिच नाही. देव मांडून परमार्थ चालला आहे. असले देव घरातून धुशी पळवितात. देवळात देवासाठी पगार देऊन राखणदार ठेवतात, अशाने परमार्थ साध्य होत नाही.

श्रीसाईचा जो बाळ व दास त्याला विरक्ति धरावी लागत नाही. देवळात गेल्या-वर सात्विक गुण धरावा लागतो. हा परमार्थ नव्हे. देव व जीवाचे ऐक्य लक्षात पाहिजे. प्रियत्वासाठी प्राणहि गेला पाहिजे हा परमार्थ, स्वदेशप्रेम असेल तर देशा-साठी मरावे लागते. मातृभूमीच्या प्रेमास्तव काहींना जगलेही पाहिजे. सारांश सर्वकाळ भक्त हे देवाचे निकटत्व भोगतात.

मनापासून देवाची पूजा करावी म्हणतात पण भक्त पूजा कशी असते ! मन तयार केलेला त्यांचा देव असतो. अर्थात मनाच्या रूपाने सतत त्यांचीच सेवा होते. शंकर पावला तर ज्ञान देईल, गणपती सिद्धी देईल, विष्णु आनंद देईल पण श्रीसाई पावला तर प्रियत्व देईल, अगोदर देव कोणता हे शोधून काढा. देवळात जाऊन परमार्थ करतात पण शरीर अगोदर की देव अगोदर हे पहा. शरीर असेल तर देऊळ, त्याबरोबर मनाची आवड असेल तर तो शरीराने देवळात जाईल, मग देव कोणता?

जीव देवाचा प्रकाश आहे. दिव धातूचा अर्थ प्रकाश, जीव देवांचाहि देव आहे. जीव प्रियत्वाचा प्रकाश तेव्हा सर्वांचे मूळ प्रिय प्रेमळ साई होय.

सांसारिक जीव शरीरधारी वासनात्मक कल्पनेच्या क्रिया करणारा असतो. त्याच्याने गुरुसेवा घडत नाही व गुरुसेवेविषयीचा आदरही नाहीसा होतो. वास्तविक

गुरु भावनेने जीव निजपदाशी तात्काळ ऐक्य पावाचा, पण ते गुरुपद सांसारिकाना ओळखताच येत नाही. मग गुरूच्या मनोगताप्रमाणे त्याची सेवा व्हावी कशी ! जीवाला गुरुसेवा प्रत्यक्ष घडली नाही तरी त्या पदाविषयीं आदर आवड पाहिजे. तो नसल्यास जीव त्या पदाला विन्मुख होतो. याला धौम्यऋषी व त्यांच्या शिष्याचे उदाहरण. अत्यंत खडतर व्रतानंतर, प्राण जाण्याची पाळी अनेकदा आल्यानंतर त्या शिष्याला निजपद भेटले. त्याचप्रमाणे गुरुपदाची भूमिका अंतःकरणात तयार नसल्याने नामदेवरायांना श्रीज्ञानेश्वरासारखे गुरू पटले नाहीत. भुंगीचिया घरा कोण धाडी गूळ । देखोनिया गूळ उडी घाली ॥ ' ( तु. म. ) नामस्मरणाने ती प्रेमाने गोडावलेली भूमिका तयार होते.

बाळासाहेब भाटे यांच्या मनावर नामसंकीर्तनाचा एवढा परिणाम झाला की, ते जे शिरडीस आले ते परत गेलेच नाहीत. तन, मन, धन श्रीसाईपदी अर्पून तेथेच शांत मनाने राहिले.

बाळासाहेब भाटे हे मूळचे बडोद्याचे रहिवासी. पुण्यास त्यांचे सेवानिवृत्त आतेबंधू बडोद्याचे दिवाण बहादुर बळवंतराव देव यांचे घरी त्यांचे बी. ए. पर्यंतचे शिक्षण झाले. नंतर त्यांना नगर तालुक्यात मामलतदार कचेरीत कारकुनाची नोकरी मिळाली व काही दिवसानी ते त्याच कचेरीत अव्वल कारकून झाले. काही काळाने ते प्रांताचे शिरस्तेदार झाले. त्यानंतर त्यांना श्रीगोंदे येथे मामलेदाराची जागा मिळाली. तेथून त्यांची खानदेशातील साखरी तालुक्यात बदली झाली.

बाळासाहेब नगरला अव्वल कारकून असताना कै. भक्तसिंह नानासाहेब चांदोरकर हे नगर जिल्ह्यातील राहुरीला अव्वल कारकून होते. नानासाहेब व बाळा-साहेब हे कॉलेजमित्र होते. बाळासाहेबांकडे १८९२ सालपासून जाऊ लागले. नानासाहेबांच्याच सांगण्यावरून १८९४।९५ साली बाळासाहेब बाबांच्या दर्शना-साठीं पहिल्याने शिरडीस गेले.

श्रीरामदासस्वामींचे एकंदर अकरा मठ आहेत. त्यांपैकी चाफळचा पहिला व बडोद्याचा दुसरा. बडोद्याच्या मठात बाळासाहेबांचे श्वशुर भाऊमहाराज शिरगांवकर राहात असत. या मठात श्रीरामाच्या मूर्तीची स्थापना केलेली होती. या मठाची सर्व व्यवस्था भाऊमहाराजच पहात असत. रामदासस्वामींचे शिष्य श्रीलक्ष्मण महाराज यांनी हा मठ बांधला. या मठास श्रीराम मंदिर म्हणतात, आणि या मठात लक्ष्मणमहाराजांची समाधी आहे.

बाळासाहेब साखरी तालुक्यात मामलेदार असताना त्यांचे श्वशुर भाऊमहाराज त्यांच्याकडे गेले होते. भाऊमहाराज हे थोर योगी व अधिकारी संत होते. त्यांनी तेथे

कीर्तन केले. संतावतंस कबीर व कमाल यांचे आख्यान लावले होते. बाळासाहेबांनी ते तद्रुप होऊन श्रवण केले.

नामाने निजपद सहज प्राप्त होते. वैराग्य प्राप्त होऊन आपली इच्छाच जर नाहीशी झाली तर निजपदप्राप्तीची इच्छाही नाहीशी होईल. मग निजपदप्राप्ती कोठची? वास्तविक जीव विषयाला झोंबत आहे असे दिसते. पण ते वस्तुतः विषयाकरिता नव्हे तर सुखाकरिता आणि ते सुख एका विषयात भेटले नाही तर जीव दुसरा विषय शोधतो. म्हणजे सोडलेल्या विषयाबद्दल आपोआप वैराग्य प्राप्त होते. म्हणजे जीव सुखाचा लोभी असून विषयांचा सहज विरागी आहे. जीव हा केवळ सुखप्रिय आहे. तत्वतः विषयप्रिय नाही. जीवाच्या ठिकाणी भोगाचे व ज्ञातृत्वाचे सहज वैराग्य आहे. वस्तू भोगून त्यात सुख पुरे झाले नाही की तो ती वस्तू टाकतो. त्याचप्रमाणे ज्ञानाने सर्व काही सोडून देतो. त्याहून साक्षी होतो. म्हणून जीवाला सहज, अविनाश व अखंड सुख भेटेल तर जीव वस्तूच्या मागे लागणारच नाही. संताच्या वाक्यांनी, कीर्तनाने, नामस्मरणाने त्या अखंड अविनाश सुखाची बाळासाहेबांची तळमळ शांत झाली आणि निजपदाची प्राप्ती करून घेण्याकरिता ते कायमचे शिरडीत राहिले.

भाऊमहाराजांचे कीर्तन ऐकण्याच्या आधीपासूनच बाळासाहेब सहकुटुंब शिरडीस बाबांच्या दर्शनाला जात असत, व नानासाहेबांच्या तोंडून बाबांच्या अतर्क्य लीला ऐकून त्यांना बाबांविषयी अत्यंत आदर वाटत असे. बाबांच्या अगम्य व आश्चर्यचकित करून सोडणाऱ्या लीलावर्णनांचे श्रवण, श्रीसाईबाबांचे पुण्यदर्शन व भाऊमहाराजांनी अधिकारवाणीने केलेले प्रासादिक चित्ताकर्षक, हृदयंगम व कर्णमधुर कीर्तन या त्रिवेणी संगमस्नानाचा बाळासाहेबांच्या कोमल अंतःकरणावर तात्काल परिणाम होऊन वैराग्य वेणीमाधवाचे अखंड दर्शन घडून त्याच त्रिवेणीत संसाराला कायमची तिलांजली देण्यास त्यांचे मन तयार झाले.

भगवंताच्या गुणसंकीर्तनाने व भाऊसाहेब महाराजांच्या रसाळ, बोधप्रद व सद्‍द वाणीने बाळासाहेबांचे मन प्रेमाने आर्द्र झाले व कीर्तनश्रवणाने त्यांचे अंतःकरण भक्तीने उचंबळून आले. भगवत्प्रेमाकरिता भक्ती, मुखचंद्रदर्शनात आल्हाद हेच भक्ताचे सौभाग्य. असा आनंदातील विहार, अशा प्रकारचा अनुभव जेथे मिळतो त्या शिरडीग्रामी बाळासाहेब रजा घेऊन सहकुटुंब आले. त्यानंतर त्यांनी आपली रजा सहा महिने वाढविली व ते कायमचे शिरडीतच राहिले. कामावर रुजू झालेच नाहीत. त्याच वेळी मध्यविभागचे रेव्हेन्यू कमिशनर मेहेरबान कर्टिसाहेब यांचे पर्सनल असिस्टंट श्री. जोगळेकर यांच्यासह शिरडीस आले. त्यांनी बाळासाहेबांस बोलावून घेतले व त्यांस कामावर रुजू होण्यास सुचविले. पण बाळासाहेबांनी कमिश-

नर साहेबांस " एकदा मी जी लेखणी खाली ठेवली ती पुन्हा हाती घेणार नाही " असे चोख, स्पष्ट, खणखणीत व ठणठणीत बाणेदार उत्तर दिले व ते नोकरीवर गेले नाहीत.

स्तब्धता, स्वेद, रोमांच उत्पन्न होणे, कंठ भरून येणे, कंप सुटणे, विकलता येणे, आनंदाश्रूंचा पूर आणि जीवाभावाचा लय हे अष्ट सात्विक भक्तिरसाचे ' अनुभव ' आहेत. यांची प्रचिती बाळासाहेबांना भगवत्साक्षात्कारात येऊ लागली. हा आनंद ज्याला प्राप्त झाला तो भक्त हा आनंद टाकून विषयानंदात कसा जाईल ?

स्तम्भः स्वेदोऽथ रोमांचः स्वरभंगोऽथ वेपथुः ।
वैवर्ण्यमश्रुप्रलय इत्यष्टौ सात्विका मताः ॥

त्यावेळी बाळासाहेबांचे वय ३७–३८ वर्षांचे असेल. नोकरीही बारातेरा वर्षेच झालेली. इतक्या थोड्या दिवसांच्या नोकरीबद्दल योग्य कारणावाचून सेवानिवृत्तिवेतन देणार तरी कोण ? मग बाळासाहेबांचा सहकुटुंब सहपरिवाराचा निर्वाह चालावा तरी कसा ? काकासाहेब दीक्षित, नानासाहेब चांदोरकर, माधवराव देशपांडे वगैरे बाळासाहेबांच्या स्नेहीमंडळीपुढे हा एक मोठा प्रश्नच पडला. कोणी काही द्रव्याची मदत केली तर ती घ्यायची नाही अशी बाळासाहेबांची वृत्ति. मग हे जुळावे कसे ? पेन्शनबद्दल अर्ज करावा की न करावा हे बाबांनाच विचारावे व ते सांगतील तसे करावे असे सर्वानुमते ठरले व बाळासाहेबांनीही या गोष्टीस मान्यता दिली. त्याप्रमाणे बाबांना विचारल्यावर ते म्हणाले, ' अर्ज करावा बाळासाहेबांस पेन्शन मिळेल.' त्याप्रमाणे त्यांनी तो अर्ज केला व कोणत्याही प्रकारचे विघ्न निर्माण न होता बाळासाहेबांना दरमहा एकोणतीस रुपये पेन्शन मंजूर झाले. ही बाबांचीच कृपा व अगाध लीला.

त्यावेळी बाळासाहेबांना १७५ रुपये पगार मिळत होता. त्या पगाराच्या १/६ इतके पेन्शन मंजूर झाले असे दिसते. बाळासाहेब फक्त दोन वेळा बाबांच्या दर्शनास जात. एकदा दुपारी व एकदा संध्याकाळी. बाकीचा सारा वेळ ते ग्रंथवाचनात घालवीत. त्यांची पत्नी, तीन मुली व दोन मुलगे असा त्यांचा शिरडी येथील परिवार होता.

बाळासाहेब हे बाबांचे निःसीम भक्त व उपासक. श्रीगोपाल कृष्ण साईंचे उपासक श्रीमंतच असणार–पैशांनी नव्हे, मनाने. ज्ञान-उपासक ज्ञानवान असतात, श्री साईंचे उपासक प्रेमळ असतात. संत म्हणतात, 'देखिला देखिला देवाधिदेव बरवा'– सर्व मानव त्या देवाचे भक्त. परंतु त्यांच्या देवात, धर्मात व बोधात फरक आहे. हृदयस्थ असा शब्द श्रुतींनी वापरला पण त्याचे स्थान कोठे आहे ? हृदयस्थानाची

प्रतीती काय ? कल्लोळ, जीवत्वाची प्रतीती म्हणजे स्मरण. जी जी कल्पना येते तीत प्रेम आहे. तोच बाळासाहेबांचा 'श्रीसाई' त्या प्रेमानंदाकरिताच ते कायमचे शिरडीत राहिले.

कर्म शेवटाला नेऊच असा कोणी निश्चय करील तर तो निश्चय ज्यामुळे तडीस जावयाचा ते आयुष्यच क्षणभंगुर आहे. कर्माला पुष्कळ द्रव्य पाहिजे. ते संसारिकाजवळ पुरेसे नसले तर ती एक अडचणच. कर्म करताना आजार आला आणि कर्म करण्यास शरीर असमर्थ झाले तरी तीही अडचणच. म्हणून संतानी म्हटले आहे, 'कर्मे तंव न पुरे सांसारिक ( तु. म. ) तसे नामाचे नाही. ते अगदी सोपे आहे. 'अवघे तुका म्हणे। विठ्ठलनामे आटले ॥" संसाराच्या–कर्माच्या सर्व खटपटीत जीव साक्षित्वाने त्या सर्वांचा कर्ता ठरतो आणि श्रीसाईनामोच्चारात ते कर्तृत्वाचे साक्षित्व असत नाही. म्हणजे जीवकर्तृत्व बुडते. अर्थात त्याचे निजपद म्हणजे सहज सुख, अविनाश सुख व अखंड सुख हे होय. ते कर्मधर्माने न मिळता त्यामुळे जीव विषयपदार्थांच्या आसक्तीत राहतो. कर्माचा कर्ता आपणच आहो असे समजतो. त्यामुळे तो अधिकच फेऱ्यात पडून, त्याची व निजपदाची चुकामूक होते. श्रीसाईनाथनामाने स्वकर्तृत्व सहज विसरून निजपदाची सहज प्राप्ती होते.

जीवनाचा जिव्हाळा जेथे उदय पावतो तेच स्वतःचे स्वतःला बरवे वाटणारे प्रेम होय. जीवाचे जीवनावर जे निरतिशय प्रेम आहे ती प्रभुप्रेमाची प्रतीती आहे.

नामसंकीर्तन साधन पैं सोपे।
जळतील पापें जन्मांतरींची ॥


# श्रीसाईलीला

## चतुर्थ लेखक – कवी स्नेहसंमेलन – १९७८

**शिरडी येथे दिनांक ५ व ६ मार्च १९७८**

अध्यक्ष :– श्री. गजाननराव जयदेव चितांबर, अहमदनगर

प्रमुख पाहुणे :– महामना श्री. राधाकृष्णस्वामी
अध्यक्ष, अखिल भारतीय साईसमाज, बंगलोर

श्रीसाईभक्तांसाठी शानदार नाटक

# शिरडीचे श्रीसाईबाबा



" शिरडीचे श्रीसाईबाबा " नाटकात श्रीसाईबाबांच्या भूमिकेत
किरणकुमार

श्री. कुमारसेन गुप्ते यांच्या आरती थिएटर्सने शनिवार दिनांक १७ डिसेंबर १९७७ रोजी दादर येथील शिवाजी मंदिरात " शिरडीचे श्रीसाईबाबा " या आपल्या नूतन मराठी नाटकाचा शुभारंभी प्रयोग केला. या सुंदर नाटकातून संत चुडामणी भगवान श्रीसाईबाबांचे तेजस्वी जीवन रंगभुमीवर सादर केलेले आहे. साईप्रेमींसाठी लिहिलेल्या या नाटकाचे लेखक व दिग्दर्शक श्री. किरण दुधाळकर हे आहेत. त्यांनी बाबांच्या जीवनातील काही ठळक संस्मरणीय असे प्रसंग दाखविलेले असून त्यांचे प्रेक्षक स्वागतच करतात. श्रीसाईबाबांची भूमिका श्री. किरणकुमार यांनी केलेली असून ती प्रशंसनीय आहे. बाबांचे चालणे, गंभीररीत्या बोलणे, हातवारे करणे इ० गोष्टी त्यांनी हुबेहुब केलेल्या आहेत यामुळे हे नाटक प्रेक्षकांच्या मनाची चटकन पकड घेते. नाटकात दाखविण्यात आलेले बाबांचे सारे चमत्कार श्री. स्वाधीन डे यांच्या कल्पक योजनेतून साकार झालेले आहेत. नाटकाला संगीत श्री. कुमारसेन गुप्ते यांनी दिलेले असून ते ऐकत रहावे असे वाटते. काकड आरती, शेजारती व अन्य साईगीते मधुर आहेत. नेपथ्याची बाजू श्री. दत्ता चौडणकर यांनी सांभाळली असून रंगभूषा व ध्वनी अनुक्रमे अनंतकुमार व सुभाष कोरगावकर यांनी यशस्वी पार पाडली आहे.

सर्वश्री श्री. दिनानाथ लाड (म्हाळसापती), भास्कर पावस्कर (चांदभाई, लक्ष्मण आप्पा डेंगळे ), अरुण बाघमारे ( अब्दुल ), विनायक रहाटे ( रामगीर, नानासाहेब चांदोरकर ), मधुसुदन आंगणे ( गंगागीरबाबा, काका दिक्षीत, श्रीमंत गृहस्थ), अशोक इंदुलकर ( शिवा, रामचंद्रदादा साठे ), सदा लवटे ( नाम्या, बुटी ), बाळ साळवी ( आप्पा जागले, शिरपा ), परशुराम राणे ( काशीराम, बापू जोग ), प्रकाश गावडे ( शामा ), दत्ता खेराडे ( हेमाडपंत दाभोळकर, खेडूत ), सुरेश आरोलकर (तात्या), बाळ नाईक ( दासगणू ), बळीराम गमरे ( गणपत, महंमद भागोजी ), मधु भंडारे ( केशव ), अनंत निगडे ( तात्या निमोणकर, खेडूत ), शशिकांत सकपाळ ( मेघा ), प्रिं. खरे ( भटजी, खेडूत ), आरती गुप्ते ( विद्या ), रविंद्र, सिद्धेश गुप्ते, अभिनंदन यांनी खेडूतांची मुले, सुमन शिरवटकर ( बायजाबाई, सरु ), मीना मळेकर ( राधाकृष्णा माई, यमू ), शुभांगी रावते ( लक्ष्मी ) व नीला आचरेकर ( पारू ) या सर्वांनी आपापल्या भूमिका अगदी समजूतदारपणे वठविलेल्या आहेत.

श्रीसाईबाबा संस्थानचे कोर्ट रिसिव्हर श्री. पाठकसाहेब व ऑलइंडिया साईसमाजाचे अध्यक्ष श्री. राधाकृष्णस्वामी या प्रथम प्रयोगाला हजर होते. प्रत्येक साईभक्तांनी हे नाटक निदान एकदा तरी सहकुटुंब पहावे अशी आमची शिफारस आहे.

—सदानंद

निबंध स्पर्धेतील दुसऱ्या क्रमांकाचा निबंध

# श्रीसाई–एक अवतार

सौ. सुनिता त्रिं. चावक,
'संजयनिवास,' गायकवाडवाडी, विष्णूनगर, डोंबिवली

● इ. स. अठराशेच्या मध्यान्हापासून इ. स. एकोणीशेच्या पूर्वार्धापर्यंत महाराष्ट्रात एक अत्यंत तेजोपुंज तारा चमकून गेला. त्याच्या प्रकाशाच्या वलयांनी ही भारत भूमी उजळून निघाली. नव्हे मानवतेची, श्रद्धेची तसेच विश्वकल्याणाची हाक हिच्या कानाकोपऱ्यात जाऊन धडकली. भारतभूमी खऱ्या अर्थाने 'मानवताभूमी' ठरली. 'वैश्विक कल्याण' हाच मंत्र येथून निनादला. त्या तेजोवलयांची ही यशस्वी पण मिणमिणती ज्योत होय.

'श्रीसाई एक अवतार' वास्तविक पहाता श्रीसाई ही व्यक्ति गूढ आहे. स्वत. बद्दल यत्किंचित् 'स्वत्व' न दाखवता ही 'सावली' होय सावली गडप झाली. त्यांचा जन्म, मातापिता, सगेसोयरे इत्यादींविषयी कुठेही माहिती उपलब्ध होत नाही. मानवी विचारांनी व तर्कामुळे ती ठरवावी लागते. पण ते प्रयत्न शेवटी निष्फळ ठरतात. श्रीसाई ही अखंड राहते नव्हे, मायापाश मोह हीने केव्हाच झुगारून दिल्याने शोधूनही काहीच सापडत नाही. ह्यातच खरी एकता, मानवता, व धार्मिकऐक्याची आर्तता त्यांनी पटवून दिली.

'अवतार' म्हटल्यानंतर त्यात त्यांचे बालपण, तारूण्य, वृद्धावस्था कार्य-त्यांचे त्यावेळेस झालेले सामाजिक परिणाम ह्यांचा परामर्श घ्यावा लागतो व शेवटी त्यांचे निरंतर सामाजिक स्थान ठरवावे लागते.

श्रीसाईंचे बालपण हा गूढतेचा गाभा आहे. बाबा कोण होते? ते कुठल्या कुळात जन्मले? त्यांचे मातापिता कोण? वगैरे प्रश्न अनुत्तरीत होतात. ते जन्मानी ब्राम्हण होते–मुसलमान होते–ते कुठल्या कुळात जन्मले ते भुसारी होते की काय. हा संकुचित वाद अल्पबुद्धी असणाऱ्यासाठीच होय. कारण जन्मामुळे कुल श्रेष्ठ ठरते, व त्यातून भेदभाव-जातिवाद निर्माण होतो. पण हेच श्रींनी नेमके हेरले होते. व म्हणून स्वतःबद्दल कुठेही, इतकेच काय कुठल्याहि परम स्नेहालासुद्धा हे अज्ञानात ठेवून विचारांचा भोवरा त्यांनी निर्माण केला, ह्यावरून श्री पूर्ण मनोनिग्रही दूरदर्शी होते ह्याचा प्रत्यय होतो. अर्थात हे तर्कानेच ठरवायचे म्हटले मग त्यांचे बोलणे त्यांचे उच्चार गावाबद्दल असणारे त्यांचे प्रेम व कुठल्या स्थानाचा ते नेहमी

उल्लेख करीत ते स्थान ह्या सर्वांचा विचार करावा लागतो व ह्यावरून असा भास निर्माण होतो की, बाबा मोंगलाईत रहात असावेत कारण तेथील गावे, कुळे व भाषेचे उच्चार त्यांच्या बोलण्यात येत. असे साईचरित्रातील त्या प्रस्तावनेत आहे. पण खऱ्या मानवतावादी आत्म्याला विश्व हेच घर, प्रत्येक मानव हा बंधु, प्रत्येक जात हेच कुळ व सर्व भाषा हीच मातृभाषा म्हणून विशालता धारण करावी लागते. हीच विशालता 'श्री' नी धारण केल्यामुळे ते संकुचित समाजात स्वतः गुरफटून घेत नव्हते.

श्रींची बालपणामधील पहिली आठ वर्षे अज्ञातवासात गेली. पण पुढील वर्षे मात्र श्रीसाई समाजास ज्ञात झाले, व ते जे प्रगटले तेच श्री तिर्थ 'शिर्डी' ह्या सामान्य खेडेगावी. बाबांनी हे क्षेत्र का निवडले हे एक कोडे आहे. पण मानवतेची हाक कुठूनहि दिली तरी त्याला जागतिक प्रतिध्वनी मिळत असतो, व जेथून हा ध्वनी प्रथम निनादतो त्या ठिकाणास तिर्थक्षेत्राचे पावित्र्य मिळते. ह्याच प्रकार शिर्डी क्षेत्री झाला असावा.

श्रीसाई आठ वर्षांचे असताना ते श्री चांदभाई (ह्या नावात खोच आहे) ह्या व्यक्तिच्या मंडळीच्या भाच्याच्या सोयरीक समवेत शिर्डी क्षेत्री आले व शेवट-पर्यंत तेथेच स्थायिक झाले.

'श्रीसाई' हे नाव आपण संकट-प्रसंगी प्रार्थनेसाठी मनात भाविकपणा निर्माण करून श्रद्धायुक्तीने उच्चारतो. पण हे नाव खरंच ठराविक व्यक्तिचे नाव आहे का ? तर हे नावसुद्धा आपल्याच सारख्या भाविकांने स्वयंस्फूर्तीने ठेवलेले किंवा ठेवून घेतलेले नाव होय. मात्र हे नाव 'श्री' नी मान्य केल्याचा पुरावा उपलब्ध आहे.

बालपणी संपूर्ण योगाची आराधना 'श्री' नी केलेली आहे असे वाटते त्यांचे शरीर रेखीव, भरीव होते. चेहरा तेजस्वीपणा ओतत होता. डोळे मोठे निर्भिड होते. तोंडावळा आकर्षक होता. उंच, धिप्पाड असा हा अजानुबाहू देह होता. गीता-कुराण ग्रंथ तोंडपाठ होते. संस्कृत व हिंदी उर्दूमिश्रित ह्यांच्यावर त्यांचा प्रभाव होता. हीच देहदृष्टी व बुद्धीमत्ता कायम होती ह्याचा उल्लेख अनेक ग्रंथात आहे.

तारूण्यावस्था ही बाबांची अनेकांची संकटे दूर करण्यात गेली. ह्या अवस्थेतसुद्ध बाबा स्वतःबद्दल ते कधीच बोलत नव्हते. मात्र भक्तांची संकटे ओळखून दूर करण्यात ते तरबेज होते. 'श्रद्धा हीच सर्व शक्ति आहे,' हा उपदेश प्रत्येक भक्तास त्यांनी दिला, व स्वतः मात्र कुठलेही स्थान न राखता फक्त देयाची भूमिका अतिशय दक्ष-तेने बजावित ही अवस्था प्रायोगिकासह (चमत्कारासह) संपविली.

वृद्धापणावस्था ही मानवी आकाराची शेवटची पायरी होय. ती पायरी बाबांनी प्रचंड देह पंचतत्वात विलीन करण्याकरिता ओलांडली.

बाबा संत–सत्पुरुष देव होते अशा अनेक कल्पना त्या वेळेस लोक करीत होते व ही विधाने त्यांची थोरवी गाण्यास योग्यच होती. पण बाबा माझ्यामते एक ' अदृश्य-छाया ' होते व आहेत. मानवी मने शरीराने बनली असल्याने व त्यात स्वार्थ-ठसठसून भरला असल्याने बाबा मानव ठरत नाहीत. ते खरोखर ' ब्रह्म ' होत. मायापाश–स्वार्थ आळस आशा ही मनुष्य म्हणून ओळखायच्या बाजू आहेत पण बाबा ह्यात केव्हाच बसले नाहीत. ती अदृश्य-छाया कुठून येते, कुठे जाते हेच समजत नाही. त्यामुळे मानवी मने तिला नीट पाहू शकत नाहीत हेच खरे पण ती सहजगत्या आपणापाशी हवी असल्यास त्या व्यक्तिपाशी श्रद्धा हवी.

बाबा संत होते, हे विधान तितकेसे बरोबर नाही. कारण भारतीय संतांनी आतापर्यंत ठराविक मार्ग समाजापुढे ठेवला आहे. तो म्हणजे वारकरी संप्रदाय किंवा देव पण बाबांनी हा मानवी गोंधळ व्यवस्थित सोडविला आहे. ' तेरा भला करेगा अल्ला ' असा आशीर्वाद ते देत. अल्ला परमेश्वर एकच. मात्र परमेश्वर आपण मुर्तिमध्ये पाहू शकतो. अल्ला ही मानावयाची परमेश्वराची अमूर्त कल्पना आहे. त्यामुळे अल्ला म्हणजे सर्वव्यापी ईश्वर होय. असे ते सांगत.

बाबांनी प्रथम संसार मांडून मग पश्चातापाने विरक्ती घेतली नाही. म्हणून ते पश्चातापाने बनलेले संत नव्हते. मायापाश त्यांनी स्वीकारलाच नाही. म्हणून ते श्रेष्ठ होत. श्री समर्थ रामदासांनी पण मायापाश स्वीकारला नाही. पण तो न स्वीकारण्याचे कारण मानवी निराशा होय म्हणून ते लग्नातून पळून गेले. पण बाबांनी ही वेळ आणलीच नाही.

बाबांनी मूर्तिपूजा सांगितली पण ती वेगवेगळ्या देवतांची. कोणाला नाथ माधवाची, कोणाला दत्ताची तर कोणाला पंढरीच्या विठोबाची ह्यावरून बाबा वारकरी संप्रदायात सुद्धा बसत नाहीत.

बाबा उदी वाटीत. पण ही उदी स्वार्थ जाळून सर्वस्वाचा होम पेटवून मानवी मनाची लाकडे त्यात जाळून तयार होत होती म्हणून ती उदी लावल्यास आजही अनेक रोग बरे होतात, मनशांती निश्चित लाभते.

बाबा अंतर्ज्ञानी होते. मानवी मनाची झेप कुठपर्यंत असते हे पूर्णपणे त्यांनी जाणले होते म्हणून ते अनेकांची संकटे ते भक्त त्यांच्यापासून दूर असूनसुद्धा ते जाणित होते व दूर करीत होते व आहेत.

नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य ! हा उपदेश आजही साई समाधीतून येतो. मानवतेची हाक आजही बाबांना समजते. पावित्र्यापेक्षा समाजसेवा आजही बाबांना मान्य आहे. जो दीन-दुबळ्यांवर दया दाखविल त्यास मी माझा मानीन असे सांगून ते प्रत्येकास आजही साईसेवेची संधी देत आहेत. मनात पाप नसेल तर यश निश्चित समजा हा आशीर्वाद आजही समाधीतून येत असतो. संकटसमयी बाबा आजही धावतात कारण श्रद्धायुक्त भाषा आजही बाबांना समजते, आणि मग मन त्यांच्याच समाधीशी एकरूप होते. त्या माझ्या अकल्पीत अदृश्य, अमूर्त अतर्क्य विधात्यांस पापी, व्यवहारीक मनाचा कोटी कोटी प्रणाम ! ★

कृपया लक्ष द्या

# श्रीसाईलीला

## लेखक-कवी संमेलन मार्च १९७८ मध्ये भरणार

राज्य विधान सभेच्या येत्या निवडणूका दिनांक २५ फेब्रुवारी रोजी येत असल्याने अनेक साईभक्त लेखक-कवी निवडणूक व प्रचार कार्यात गुंतलेले आहेत आणि म्हणून शिर्डीस २६ व २७ फेब्रुवारी १९७८ रोजी भरविण्यात येणारे लेखक कवी संमेलन **रविवार ता. ५ व सोमवार ता. ६ मार्च १९७८** रोजी भरविण्यात येत आहे. कृपया संबंधित लेखक-कवींनी याची नोंद घेऊन शनिवार दि. ४ मार्च १९७८ रोजी शिरडीस येण्याचे करावे व तसे आपण येत असल्याचे आगाउ पत्र श्री. का.सी. पाठक कोर्ट रिसिव्हर साहेब श्रीसाईबाबा संस्थान, मु. पो. शिरडी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर यांना २० फेब्रुवारी पर्यंत कळवावे ही विनंती म्हणजे व्यवस्था करणे ठीक पडेल. २० तारखे नंतर मात्र व्यवस्थेच्या बाबतीत कृपया कोठलाही पत्रव्यवहार करू नये.

निमंत्रक

**–श्री. का. सी. पाठक**
कोर्ट रिसिव्हर

कार्यवाह

**–डॉ. श्रीराम दि. परचुरे**
**–श्री. सदानंद चेंदवणकर**
का. संपादक श्रीसाईलीला

निबंध स्पर्धेतील उत्तेजनपर निबंध

# श्रीसाई—एक अवतार

— श्री. रा. के. काळे, १७४ अभ्यंकर नगर, नागपूर.

" नर करणी करे तो नर का नारायण बन जाय " अशी हिंदी भाषेत एक म्हण आहे. म्हणजे मनुष्याने उत्तम कार्य केले तर त्यास देवत्व प्राप्त होऊ शकते. मनुष्याजवळ एक प्रकारची बुद्धि असते. त्यायोगे एखादी गोष्ट चांगली किंवा वाईट, योग्य किंवा अयोग्य याबद्दलचे ज्ञान त्यास प्राप्त होते. हीच बुद्धि, कार्य जर वाईट असेल तर ते तू करू नकोस, असा सल्ला देते. योग्य-अयोग्याचा सल्ला देणारी बुद्धि मनुष्याच्या हृदयात कार्य करण्याच्या वेळेस किंवा कार्य झाल्यावर जागृत होते. यामुळे माणसास कर्तव्य व अकर्तव्य याची जाणीव होते. मग सावकाश मनुष्य हा परमेश्वराकडे नेणाऱ्या मार्गावर चालू लागतो व मग तो साधक होतो. नंतर साधू, संत, महंत व शेवटी परमेश्वर होतो.

साधू संत हे परमेश्वराच्या अधिक जवळ गेलेले असतात. देह व आत्मा ह्यातील फरक ते जाणतात. " मी आत्मा आहे " हे ज्ञान त्यांना झालेले असते. ते नेहमी आनंद सागरात विहार करत असतात. त्यांचे शरीर व मन आनंदाने पुलकीत झालेले असते. त्यातच तो मग्न असतो. मनुष्याला असा आनंद प्राप्त करून घ्याव-याचा असेल, तर साधू संतांनी अवलंबिलेल्या मार्गावर चालणे हेच त्याचे कर्तव्य होय. परंतु त्या मार्गावर चालत असताना, त्या साधूला, सत्पुरुषाला श्रद्धास्थान मानणे म्हणजे साधकाला साध्याचे विस्मरण होणे असा होईल. श्रद्धास्थान म्हणून परमेश्वराची निवड करणे हेच योग्य. मी श्रीसाईबाबांची परमेश्वर म्हणून निवड केली आहे. त्यांचे अनेक भक्तगण त्यांना परमेश्वरच मानतात. श्रीसाईबाबांचा जन्म कोठला, त्यांचे मातापिता कोण, वगैरे प्रश्न अनुत्तरीतच आहेत. त्यांच्या सानिध्यात असणाऱ्यांनी याबद्दल प्रश्न विचारला असताना बाबांचे उत्तर एकच " मी परमेश्वराचा सेवक आहे. " कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर हे श्रींच्या सहवासात होते. त्यांनी " श्रीसाई सच्चरीत्र " नावाचा ओविबद्ध ग्रंथ लिहिला आहे. कै. दाभोळकर हे व्यवसायाने मॅजिस्ट्रेट होते, व त्यांनी घटना घडल्याप्रमाणे दिल्या आहेत. ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे त्या व्यक्तिची नावे, पत्ते, वगैरे माहिती पुराव्यादाखल दिली आहे. म्हणून ग्रंथ अंधश्रद्धेवर विश्वासून लिहिला नाही. ग्रंथाचा अभ्यास केल्यास श्रीसाईबाबा हे अवतार होते. श्रीदत्ताचे अवतार होते हे कळून येईल.

कै. दाभोळकर हे वादपटु होते. प्रथमच ते जेव्हा शिरडीस आले, त्या रात्री उपस्थित भक्तगणांबरोबर वेदांतावर चर्चा केली. सकाळी ते ज्यावेळी श्रीबाबांच्या दर्शनास द्वारकामाईत आले, त्यावेळी श्रीबाबांनी त्यांना विचारले की रात्री कसली चर्चा चालली होती. यावरुन श्रीसाईबाबांना अंतःर्दृष्टी होती व कै. दाभोळकर हे वादविवाद पटू होते हे समजते.

श्रीसाईबाबा वयाच्या १६ व्या वर्षी शिरडीत आले असा उल्लेख "श्रीसाई-सच्चरित्र" ह्यात आहे. त्यावेळी ते निंबवृक्षाखाली मौन धरून बसले होते. शिरडीच्या काही लोकांच्या अंगात ग्रामदेवतेचे वारे आले व ग्रामदेवतेने सांगितल्याप्रमाणे निंबवृक्षाखालील जमीन खोदली. तेथे विटा, मग चुनागच्ची केलेले भुयार सापडले व त्या भुयारात चार समया पेटलेल्या स्थितीत सापडल्या. देवतेने सांगितले की हा मुलगा येथे १२ वर्षे तप करत होता. (अध्याय ४, ओवी ११८). ही घटना शिर्डीच्या अनेक लोकानी पाहिलेली आहे. अतर्क्य अशी ही घटना आहे. कारण बंद असलेल्या जागेत जळत्या समया सापडणे हे अशक्यच होय. "१२ वर्षे जप" करत होता म्हणजे तपासाठी श्रीबाबांनी वयाचे चौथ्या वर्षी सुरवात केली असे सिद्ध होते. म्हणून श्रीसाई हे अवतारी पुरुष होते असे मानावे लागते.

श्रीसाईबाबांचे चरित्र चमत्कारांनी पूर्ण भरलेले आहे. त्यांचे चमत्कार करण्याचे दैवी सामर्थ्य देह ठेवीपर्यंत चालू होते, असा पुरावा त्यांच्या चरित्रातच आहे. बाळा नेवासकराच्या वर्षश्राद्धास निमंत्रीपेक्षा जास्त माणसे आली. तेव्हा तयार केलेली पाकसिद्धि कशी पुरावी ह्या विवंचनेत मंडळी होती. तेव्हा नेवासकरांच्या पत्नीने सुनेस सांगितले की श्रीबाबाजवळ असताना कशास काळजी हवी. सर्व भांड्यात थोडी उदी घाल व भांडे झाकून ठेव. वाढण्यापुरतेच उघडून अन्न घे. त्याप्रमाणे केले असताना सर्वांची आकंठ जेवणे झाली तरी अन्न शिल्लक होतेच. (अध्याय ३५, ओव्या १८७ ते १९५).

असाच चमत्कार श्रीकृष्णाचे चरित्रात आहे. म्हणून श्रीबाबा त्याच्या बरोबरीचे होते काय ? फार तर ते सिद्धी प्राप्त झालेले सिद्ध पुरुष म्हणता येईल.

नेती, धोति, खंडयोग ही अधिकारी पुरुषाची लक्षणे आहेत. श्रीसाई-बाबांनी हे योग केले होते. (अध्याय ७, ओव्या ५३ ते ६९). म्हणून ते अधिकारी पुरुष होते असे म्हणता येईल.

श्रीसाईबाबांची सत्ता निसर्गावर देखील चालत असे. ह्याची उदाहरणे अध्याय ११ मध्ये आहेत. ती अशी : प्रचंड वादळ, जोराचा पाऊस, सर्वत्र पाणीच पाणी हा निसर्गाचा कोप मशिदीच्या ओट्यावर उभे राहून, मोठ्याने ओरडून शांत केला. तसेच धुनीने घेतलेला पेट, श्रीबाबांनी सटका खांबावर मारत मारत, तोंडाने "सुबूर,

सुबूर, हट माघारा " असे म्हणत शांत केला. म्हणून त्यांची सत्ता पंचमहाभूतांवर चालत असे, असे सिद्ध होते.

श्रीसाईबाबांनी उदीने किंवा नुसत्या दृष्टिक्षेपाने असाध्य रोग बरे केले आहेत. ह्याबद्दल उदाहरणे अध्याय १३ मध्ये आहेत. हे चमत्कार कदाचित् योगी पुरुषाच्या कक्षेतील असतील असे म्हणणे चूक होणार नाही. पण त्याच्या त्रिकाल ज्ञानाच्या कथा अनेक आहेत. श्रीसाईसच्चरित्रात अध्याय ५१, ओव्या १२५ ते १८० मध्ये वर्णन केलेली पुंडलिकरावांची गोष्ट. श्री वासुदेवानंद स्वामींनी पुंडलिकाच्या बरोबर श्रीसाईबाबांना नारळ पाठवला पण तो नारळ चिवड्याबरोबर फोडून खाल्ला गेला व शिरडीत गेल्यावर बाबांनी नारळाची मागणी केली. सत्य सांगितल्यावर बाबा म्हणाले की माझ्याच संकल्पाने तो नारळ फुटला. तसेच अध्याय ९, ओव्या ७० ते ११४ मध्ये वर्णिलेली साखरेच्या नैवेद्याची गोष्ट.

तसेच बाबांना पूर्वजन्माचे ज्ञान होते. ह्याविषयी दोन तीन दाखले त्यांच्या चरित्रातच आहेत. अध्याय १५ मध्ये सांगितलेली पालीची कथा, मशिदीत पाल चुकचुकली तेव्हा बाबांनी सांगितले की तिची बहीण औरंगाबादेहून येत आहे व ते सत्य झाले. तसेच अध्याय ४७ मध्ये सांगितलेली वीरभद्र व बसाप्पा ह्यांची गोष्ट. ह्या दोन्ही गोष्टींवरुन त्यांना प्राणीमात्राच्या पूर्वजन्मीचे पूर्ण ज्ञान होते हे सिद्ध होते.

वरील उदाहरणांव्यतिरीक्त, श्रीसाईबाबांच्या चरित्रात विशेष प्रकारच्या चमत्काराच्या मालिका आहेत. परब्रह्माशी एकरुप झालेल्या महापुरुषाना जे शक्य झाले नाही—म्हणजे निरनिराळ्या देवता-देवांच्या स्वरुपात प्रकट झाल्याची उदाहरणे त्यांच्या चरित्रात आहेत. त्यापैकी काही उदाहरणे पाहू —

१. अ) नासिक क्षेत्रातले श्री. मुळे सामुद्रिक यांचे—श्री बाबांचा त्यांना हात तर पहावयास मिळाला नाहीच. पण त्यांचे गुरु घोलप ह्यांच्या रुपात साईबाबांचे दर्शन त्यांना मिळाले. ( अध्याय १२ )

१. ब) दासगणूंना शिर्डीतच प्रयाग तिर्थाचे दर्शन झाले. त्याबरोबरच दासगणूंनी उत्स्फुर्त गीत केले. ते असे—

" अगाध शक्ति अघटीत लीला तव सद्‌गुरुराया,
जड जीवाते भवि तारराया तूं नौका सदया ॥ ध्रु० ॥

पूर्ण गीत अध्याय ४ मध्ये आहे. ते वाचकांनी तेथे पहावे.

१. क) श्रीसाईबाबांनी दासगणूंना नाम सप्ताह मांडावयास सांगितले. तेव्हा दासगणू म्हणाले की पंढरीचा विठ्ठल येथे प्रकटला पाहिजे. बाबांनी उत्तर दिले की होय, येथेच तो प्रकटेल. ही मशीदमाई म्हणजे ठाकोरनाथाची डंकपुरी,

तीच विठ्ठलाची पंढरी, तीच रणछोडदासांची नगरी. देवभक्तासाठी कोठेही धावत जाईल. फक्त भक्तप्रेम पाहिजे.

वरील उदाहरणावरून श्रीसाईबाबा हे देवाचे अवतार होते यात संशय तिळमात्र नाही. ते कोणत्या देवाचे अवतार होते ह्याबद्दलचा दाखला त्यांच्या आरतीतच आहे. ती आरती "आरती साईबाबा, सौख्यदातार जीवा" हीच ती आरती. माधवराव अडकर, यांनी तयार केलेली ही आरती. ह्या आरतीवर श्रीबाबांनी स्वतः शिक्कामोर्तब केले आहे. हीच आरती श्रीबाबांनी श्री. बापूगिराबरोबर उदीसह, शिरडीहून जामनेरास नानासाहेब चांदोरकरांकडे पाठवली ह्याचा अर्थ त्या आरतीत असलेल्या चरणावर–कलीयुगी अवतार, सगुण ब्रह्म साचार, अवतीर्ण झालासे, स्वामी दत्त दिगंबर– पूर्णपणे शिक्कामोर्तब केले असा होतो. म्हणून ते दत्तावतार होते.

दुसरे असे की श्रीबाबांचे प्रमुख कार्य म्हणजे धर्माधर्मातील मतभेद, भांडण, झगडा नष्ट करून परधर्मसहिष्णुतेच्या पायावर आचार धर्म स्थापन करणे हे होय. हेच कार्य श्रीमाणिकप्रभु व श्री अक्कलकोटचे स्वामी यांनी केले. त्यांना दत्तावतारच मानतात. कार्यपरंपरेप्रमाणे श्रीबाबांनी हेच कार्य केले. म्हणून ते दत्तावतार होते, असे म्हणावे लागते.

तसेच श्रीसाईबाबा हे कृष्णावतार होते असेही मानता येते. कारण ज्या मशिदीत श्रीबाबांनी वास केला, त्यास बाबा नेहमी द्वारकामाई म्हणत. श्रीकृष्णानी सोन्याची द्वारका बुडवून दुसरी द्वारका उभी केली. कदाचित् तीच द्वारका शिरडी येथे किंवा जवळपास असेल. शक्य आहे. म्हणूनच कदाचित् तीस श्रीबाबा मशिदीस द्वारकामाई म्हणत असावेत. दुसरे म्हणजे नागपूरच्या श्रीमंत बुटीसाहेबांनी बांधलेल्या दगडी इमारतीत गोपाळ कृष्णाची मूर्ती बसवली जाणार होती. ते मग समाधी मंदीर झाले. श्रीबाबांच्या शब्दांवरून ते म्हणत की आपण ह्या वाड्यात राहू, खेळू, आनंदाच्या, सुखदुःखाच्या गोष्टी करू म्हणून बाबाच हे श्रीकृष्ण होते हे खरे.

श्रीबाबा हे दत्तावतार असोत, किंवा श्रीकृष्णावतार असोत किंवा श्रीविठ्ठल असोत, एकच गोष्ट सत्य होती व आहे ती ही की श्रीसाईबाबा दयाघन आहेत. आमच्या भावना ते पूर्णपणे जाणतात व त्याप्रमाणे अनुभव देतात. श्रीसाईबाबांच्या आरतीतच म्हटले जाते की–जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव, दाविसि दयाघना, ऐसी तुझी ही माव –

म्हणून वाचकांस विनंती की श्रीसाईबाबांवर पूर्ण श्रद्धा ठेवा व मग "देव भावाचा भुकेला" ह्या वचनाचा अनुभव घ्या. देव आपल्या भावनेत आहे, श्रद्धेत आहे.

श्री साईबाबांस लाखो प्रणाम !!

# " साई " शब्दाचा अर्थ

—श्री. विजय द. हजारे, एम. ए.
सी/६, गुंफादर्शन, बोरीवली (पूर्व)
मुंबई नं. ६६.

● वास्तविक " ' साई ' ह्या शब्दाचा अर्थ " यावर लिहिताना खरं म्हणजे माझी स्थिती म्या पामरे काय बोलावे अशी झाली आहे. आणि अर्थात ते साहजिकच आहे म्हणा ! तरीदेखील मला कळलेला, जाणवलेला, मला अभिप्रेत असलेला 'साई' ह्या शब्दाचा अर्थ सांगण्यासाठी मला हा प्रपंच करावाच लागतोय. कारण... दुसरं तिसरं काही नाही तर फक्त साई-इच्छा... साई आज्ञा !

कित्येक वर्षांपूर्वी संत कबीरानी साईचा अर्थ, ' सर्वज्ञ, सर्वशक्तीमान परमेश्वर,' त्यांच्याच शब्दात म्हणायचं तर " उपरवाला " असा सांगितलेला आहे. कारण म्हणूनच ते म्हणतात, " साईंसे सब होता है, बन्दे से कुछ नहीं "

" राईसे पर्वत करे, पर्वत राई माही. "

अगदी पहिल्यांदा ज्यावेळी " बाबा " शिरडी गावामध्ये अवतीर्ण झाले त्यावेळी शिरडीमधील खंडोबाभक्त म्हाळसापतीनी त्यांना साद घातली. " या साईबाबा..." आणि तेव्हापासून " बाबां "चं ' साईबाबा ' हेच नाव रूढ होऊन गेलं.

माझ्या वयाच्या सात एक वर्षांपासून मी ' बाबांची ' भक्ती करतोय. जवळ जवळ पंचवीस वर्षांपूर्वी, जेव्हा मी टायफॉईडने बिछान्यावर पडून होतो तेव्हा त्या भयंकर दुखण्यात आयुष्यात पहिल्यांदा ' बाबां 'ची मला ओळख पटली. माझे पूज्य शेजारी एकुदादा आणि कुसुमवहिनी यानी 'साई'नामाद्वारे सहजसुलभ जीवनाचा मार्ग दाखविला हे मला प्रांजळपणे कबूल केलंच पाहिजे. कारण सात आठ वर्षांचे ते वय पाठांतर वगैरे करण्याचं नसतानासुद्धा, न लिहिता वाचता, फक्त त्यांच्याकडून ऐकून बाबांच्या शिरडी माझे पंढरपूर, अनंता तुला कसे रे स्तवावे; ऐसा येईबा.. वगैरे प्रार्थना माझ्या तोंडपाठ होऊ शकल्या होत्या. तेव्हापासून गेले पंचवीस वर्ष मी ' साई ' शब्दाचा अर्थ शोधतोय, आणि दिवसेदिवस येणाऱ्या वेगवेगळ्या-बाबांच्या अनुभूती, प्रचितींमुळे तो अधिकाधिक भव्यदिव्यसा विस्तीर्ण—गूढ—होत जातोय.

माझ्या मते तरी 'साई' चा शाब्दिक अर्थ स+आई म्हणजे चांगली आई! पण माझ्या अंतःकरणात खोलवर रुतलेला अर्थ वेगळाच आहे आणि तो म्हणजे.. सहा+आई म्हणजे सहावी आई.

आता आई ही 'आई'च असते आणि साहजिकच तिच्या मातृत्वामुळे ती 'चांगली, सुंदर, मंगल' अशी असतेच असते. 'साई' म्हणजे परमेश्वर, परमात्मा, भूतलावरले संतशिरोमणी की ज्याच्या हृदयात सदैव मातेची माया, वात्सल्याचा झरा साऱ्या-साऱ्यांसाठी एकजात सगळयांसाठी-नित्य वहात आहे. साई फक्त कुणा एका-दुकऱ्याची 'माता' नाही तर अखिल मानवजातीची, प्राणिमात्राची 'जन्मदाती' आहे. बाबांचे सर्वच भक्त त्यांना त्यांच्या लेकरांप्रमाणे आहेत आणि त्यामुळे सगळयांवर त्यांची कृपादृष्टी सारखीच होते. कुणाचीहि जातपात, धर्म; अथवा गरीब-श्रीमंत हा भेद न करता सगळयांकडे ते सारख्याच नजरेने पाहतात. त्यांची काळजी वाहतात आणि त्या साऱ्यांना सांगतात, "मी येथे आहे मग तुला भीती कशाची?"

ज्यावेळी 'साई' शब्दाचा अर्थ मला सहावी आई असा वाटतो त्यावेळी "पृथ्वी, जल, वायु, आकाश आणि तेज" ही पंचमहाभूतं पाचव्या आईप्रमाणे (पहिल्या पाच आई– First Five Mother) तर "साई" म्हणजे ह्या पाच-महाभूतांच्यावर म्हणून "साई" असाच अर्थ अभिप्रेत असतो. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर 'साई' म्हणजे निसर्ग,-दैवी चमत्कार, दैवी व्यक्तीमत्वातील परमेश्वरावतार!

"साई" ह्या शब्दाचा अर्थच मुळी सच्चिदानंद! म्हणजेच सत्-चित्-आनंद! त्याचाच अर्थ सत्य, पूर्णत्व, प्रेम आणि हर्ष! निराकार निर्गुण अवकाश! अथांग, अखंड काळ! अभेद्य आकाश! ॐ कार! ओम शांती!

असं म्हटलं जातं की हा भवसागर तरून जाण्यासाठी जिथून आपण आलो त्या 'अनंता' शी एकरूप होणं अत्यावश्यक आहे. अध्यात्मिक तत्वज्ञानाप्रमाणे ते जर खरं असेल तर 'साई' म्हणजे ती जागा, ते ठिकाण की जेथून आपण आलो आहोत आणि जेथे आपल्याला जायचं आहे, अर्थात त्यालाच 'अनंत' म्हणतात. अनंतातून आलेल्या प्रत्येकाला अनंतातच विलीन व्हायचं असतं.

'साई' चा अर्थच अनंतता, अथांगता की, त्याच्या सहाय्यातच प्रत्येकजण आपल्या जीवनातलं अंतिम ध्येय गाठू शकतो. आणि ज्याला बाह्यजगाचे आकार-विकार स्पर्श करू शकत नाहीत.

बाबांनी आपल्या भक्तांना सांगितलेले दोन शब्द म्हणजेच 'साई' ह्या शब्दाचा खरा-खुरा अर्थ आहे. गूढार्थ! 'साई' चा अर्थच 'श्रद्धा' आणि 'सबुरी'! विश्वास आणि अचलता, धीरगंभीरता!

तुम्ही आम्ही तर काय ह्या कलियुगातली माणसं पण शेकडो वर्षापूर्वीच्या-संत-कवींच्या काळातदेखील – ज्यावेळी 'साई' नी मानवदेह धारण केला नव्हता त्या काळीदेखील सूरदासजी, संत कबीर, तुळसीदास ह्यांच्यासारख्यांनादेखील 'साई' ह्या शब्दाचा नेमका, बरोबर एकच असा अर्थ सांगणं आणि लावणं कठीण गेलं होतं. त्याबाबत त्यांच्याच शब्दात सांगायचं तर—

"भारी कहूं तो बहु डरू
अलका कहूं तो झुठ
मैं क्या जानूं 'साई' को
नैन न कभी न डिठ"

तर ह्यावरून हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे की 'साई' चा अर्थच हिंदूंचा 'राम शाम सदाशिव', मुसलमानांचा 'अल्ला परवरदिगार', ख्रिश्चनांचा 'येशू' तर पारशांचा 'झोरोस्टर'; बौद्धांचा भगवानबुद्ध, जैनांचा 'दिगंबर महावीर'! 'साई' म्हणजेच गुरूगोविंद. म्हणूनच तर दासगणूनी म्हटलंय ना की " 'साई' बाबा रमावर..." ★

## श्री. मधुकर रासने यांचे दुःखद–निधन

पुण्यातील एक थोर वयोवृद्ध साईभक्त श्री. नानासाहेब रासने यांचे थोरले चिरंजीव श्री. मधुकर यांचे पुणे येथे ता. २१ आक्टोबर १९७७ विजया दशमीचे दिवशी सकाळी ९ वा. अल्पशा आजारानंतर दुःखद निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ५२ वर्षांचे होते. त्यांचा स्वभाव अत्यंत मनमिळावू होता. वडीलांसारखे ते सुद्धा साईभक्त होते. शिवाजीनगर येथील श्री साईनाथ मंदीरात ते वरचेवर येत असत. त्यांच्या निधनाने पुणेकर एका निष्ठावंत थोर साईभक्ताला कायमचे मुकले आहेत. त्यांच्या आत्म्याला चिरशांती लाभो ही श्री साईचरणी प्रार्थना.

## साईभक्त इंदिराबाई सावंत यांचे दुःखद निधन

शिरडी संस्थानचे एकवेळचे एक विश्वस्त कै. नागेशराव सावंत यांच्या सुशील पत्नी इंदिराबाई या ता. ९ डिसेंबर १९७७ रोजी पहाटे ५ वा. साईचरणी विलीन झाल्या. निधनसमयी त्यांचे वय ७९ वर्षांचे होते. रोज त्या भल्या पहाटे उठून बाबांची पूजाअर्चा इ. सेवा करीत. रामनवमी व दसऱ्यास त्या न चुकता शिर्डीला जात व प्रत्येक कार्यक्रमातून उत्साहाने या वयातही भाग घेत. त्यांचे मागे तीन पुत्र व दोन कन्या आहेत.

ईश्वर मृतात्म्यास सद्‌गति देवो.

# परमं विचित्रं लीला विभूती

# उदी ! उदी !! उदी !!!

– कु. शैला अंबाजीराव सरोदे,

उर्ड्डीआल बिल्डिंग, न. चिं. केळकर पथ, दादर, २८

● प्रत्येक साईभक्तांच्या जीवनात लहानापासून मोठ्या संकटात क्षणाचाही विलंब न लावता बाबा ह्या उदीच्या रूपाने धावून आले आहेत, येत आहेत व जगाच्या अंतापर्यंत येणार आहेत.

मोठ्यातल्या मोठ्या संकटात बाबांची चिमूटभर उदी भक्ताला धैर्य देते, आणि शांती देते. कधी कधी अचानक आलेले वावटळसुद्धा तितक्याच अचानकपणे नाहीसे होते. कित्येक साईभक्तांना ह्या उदीने चित्तथरारक प्रसंगातून वाचविले आहेत. कित्येकांना मरणाच्या दाढेतून ओढून काढले आहे. उदीचा महिमा प्रत्येक साईभक्ताला परिचित आहे, आणि साईभक्ताने ह्या उदीला आपल्या जीवनात बाबा इतकेच महत्त्वाचे स्थान दिलेले आहे.

अशा ह्या बाबांच्या उदीचे आम्हालासुद्धा इतके अनुभव आले आहेत, की हे सर्व अनुभव लिहायचे झाल्यास एक स्वतंत्र पुस्तकच तयार होईल.

१) एकदा असेच आमच्या आईच्या हाताला जबरदस्त मार बसल्यामुळे हाड फ्रॅक्चर झाले होते व हाताला प्लॅस्टर घातले होते. पुढे काही दिवसानी ते काढले. तरी पण मनगटाचे थोडे दुखणे शिल्लक होते. त्यामुळे आईने डॉक्टराकडून नवीन गोळ्या लिहून आणल्या व त्यातल्या तीनच गोळ्या संबध दिवसातून एकेक घेतली. व त्या गोळ्या उपायाऐवजी आईला अपायकारक ठरल्या. संध्याकाळपासून तिला एकाएकी सर्दी झाली व रात्री ती इतकी वाढली की नाकातून सारखे पाणी गळायला लागले व उशी सुध्दा भिजू लागली. हातपाय गार पडू लागले. आपली आता धडगत नाही असे तिला वाटू लागले. माध्यान्ह रात्र असल्याने जाणार कुठे ? आई सरळ बाबांच्या फोटोकडे उभी राहिली. थोडी उदी पाण्यात घालून बाबांच्या चरणांना लावून तीर्थ म्हणून ते पाणी प्यायली. वर एक, दोन मिनिटातच तिला एकदम मोठी उलटी झाली, व थोड्याच वेळात तिला गाढ झोप लागली व दुसऱ्या दिवशी तिला बरे वाटू लागले.

२) रोजच्या दैनंदिन व्यवहारातही खूप अनुभव येतात. एखादी वस्तू खूप शोधून सापडत नसल्यामुळे किंवा स्मरण होत नसल्यास उदी लावून पुन्हा शोधल्यास पटकन सापडते.

एखादी इच्छा असल्यास किंवा एखादे काम होत नसल्यास रोज ती इच्छा बाबांसमोर बोलून पाण्यात उदी घालून ते पाणी बाबांच्या चरणाना स्पर्श करून तीर्थ घेतल्यास काही दिवसातच आपली इच्छा पूर्ण होते. उदीचा चमत्कार जितका सत्य आहे त्याबद्दल सांगताना आणखी एक फार महत्त्वाचे लक्षात घेऊन सांगावयाचे म्हणजे उदीचा उपयोग करताना ती ज्या भावनेने श्रद्धेने घेतली जाते त्या प्रमाणातच तिचा प्रभाव दिसून येतो. बाबांनी स्वहस्ते पेटविलेल्या धुनीतून ही संजीवनी समान उदी लाखो भक्तांना बाबांच्या सामर्थ्याची प्रचीती देत अजूनही जळत आहे. अशा त्या त्या पवित्र धुनीमाईला वंदन करताना मुखातून नकळत पुढील ओळी बाहेर पडतात.

परमं पवित्रं बाबा विभूती
परमं विचित्रं लीला विभूती
परमार्थ इष्टार्थ मोक्ष पदार्थी
बाबा विभूती अहं रक्षयामि

# साईनाथांनी महान संकटातून सोडविले

– बि. विजयकुमार,
१-३-१४५, न्युटाउन, महबूब नगर ( आंध्रप्रदेश ).

(१)

● मी शिक्षण खात्यात एक साधारण मॅट्रीक पास शिक्षक म्हणून प्रवेश केला, पण आज श्रीबाबांच्या कृपेने सतत अभ्यास व चिकाटीच्या बळावर मी एक जेष्ठ अध्यापक आहे. आज मी एम. ए. बी. एड्. आहे व लवकरच लेक्चररच्या पदावर माझे बाबा मला नेऊन पोचवतील अशी माझी ठाम श्रद्धा आहे.

सुमारे तीन वर्षापूर्वी माझी सौभाग्यवती एका मोठ्या संकटातून बाबांच्या कृपेने बचावली. तिचा तो पुनर्जन्म म्हटलं तरी चालेल. तिच्या मैत्रीणीसह एका हळदी-कुंकुवाच्या समारंभातून ती परत येत असता, अकस्मात् पाठीमागून एक बैल-गाडी, ज्यास गाडीवान नव्हता, अगदी वेगाने येत होती. रस्ता तर अरुंद व उतार. सर्व गोंधळल्या व सैरावैरा " गाडी आली, गाडी आली " म्हणत पळत सुटल्या. माझ्या सौभाग्यवतीस काही सुचले नाही. गाडी अगदी जवळ आल्यावर, कोणीतरी तिला बाजूला ढकलल्यासारखे झाले व ती रस्त्याच्या कडेला बेशुद्ध होऊन पडली. सर्वांना

वाटले की तिच्या डोक्यास गाडीचा धक्का लागला व ती आता वाचणार नाही. परंतु बाबांनीच तिला वेळेवर बाजूला सरकवून तिच्या केसालादेखील इजा करू दिली नाही. पाच दहा मिनिटातच ती शुद्धीवर आली व तिला घरी नेण्यात आले. रस्ता इतका अरुंद होता की निश्चितपणे तिचा हात किंवा पाय तरी मोडला असता पण " बाबा तारी त्यास कोण मारी. "

(२)

तीन महिन्यापूर्वी माझ्या वृद्ध मातोश्रीच्या डोळ्यात मोतिबिंदुमुळे अति त्रास होऊन तिचा डोळा अगदी लाल झाला होता. तिला फार वेदना होत होत्या. शस्त्र-क्रिया करणे अगदी आवश्यक होते. पण तशी सोय लवकर झाली नाही. त्यावेळेस ती उदगीरला होती. आई मात्र सारखी बाबांचा धावा करायची. डॉक्टरानी केस सीरियस आहे व डोळा बरा होणार नाही म्हणून निराश केले. शेवटी गेल्या महि-न्यात तिला मुंबईला ( दादरला ) माझ्या बहिणीकडे नेण्यात आले. घरासमोरच डॉ. वझे प्रख्यात नेत्र तज्ञ आहेत. त्यांना दाखविल्यावर ते देखील केस कठीण आहे पण प्रयत्न करू असे म्हणाले. चार दिवसानंतर त्यांनी शस्त्रक्रिया केली व साईबाबांनी त्यांना यश दिले. शस्त्रक्रियेच्या वेळी माझ्या आईजवळ बाबांची उदी होती.

(३)

माझ्या घराच्या शेजारी असलेल्या माझ्या मित्राचा एक वर्षाचा मुलगा एके रात्री ( दोन महिन्यापूर्वी ) एकाएकी जोराने सारखा रडू लागला. दोन तास झाले तरी त्याचे रडे थांबेना. सर्व अगदी कासावीस झाले. घरगुती उपचार करून पाहिले पण तो जास्तच रडू लागला. शेवटी मी त्याच्या कपाळाला श्रीसाईंची उदी लावली व श्रीसाईनाथाचा दहा वेळा जप केला. काय आश्चर्य ! त्याचे रडे एकदम् बंद; व तो हसावयास लागला.

असे अनेक अनुभव श्रीबाबांविषयी आम्हास आले आहेत. मला तर त्यांच्या-शिवाय अन्य कोणाचाही आधार नाही. माझ्या जीवननौकेचे तेच कर्णधार ! आमच्या कुटुंबात ते एका वडील माणसाप्रमाणे वावरत आहेत व आशीर्वादाचा हात दाखवून नेहमी धैर्य देतात व मदत करण्यासाठी तयार असतात अशी आमची धारणा झाली आहे.

" साई शरणं गच्छामी "

---

* माहिमचे **श्री. बाबासाहेब लिमये** यांनी सांगितलेल्या सुरस साईलीला एप्रिल १९७८ अंकापासून क्रमशः वाचा.

# मुंबई मराठी पत्रकार संघाची शिरडीस भेट

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे कोर्ट रिसिव्हर साहेब श्री. का. सी. पाठक यांनी शिरडी भेटीचे दिलेल्या आमंत्रणाचा स्वीकार करून मुंबई मराठी पत्रकार संघाने शनिवार–रविवार १४ व १५ जानेवारी १९७८ रोजी शिरडीस सहकुटुंब भेट दिली.

शनिवार दि. १४ रोजी मकरसंक्रांतीस पहाटे ६ वाजता सुमारे ८० वर मंडळी शिरडीस लक्झरी बसेसनी येऊन थडकली. त्यांचा निवास, स्नान, चहापान, भोजन इ. ची सर्व व्यवस्था संस्थानने नव्या शांती निवास इमारतीत २० खोल्यातून केली होती. सकाळची सर्व ती नित्यनैमित्तिक कामे आटोपल्यावर मंडळी सकाळी १० वा. साकोरीस श्रीसती गोदावरी माताजींच्या दर्शनास गेली. तिथे डॉ. शांताराम टिपणीस, व्यवस्थापक यांनी सर्वांचे स्वागत करून श्रीउपासनी कन्याकुमारी आश्रमाचा परिसर दाखविला श्रीमाताजींनी त्यांना दर्शन देऊन सर्वांना स्वहस्ते प्रसाद दिला. नंतर मंडळी दुपारच्या आरतीस शिरडीस परतली व बाबांच्या प्रसाद ग्रहणानंतर त्यांना शिर्डी संस्थानचा संपूर्ण परिसर दाखविण्यात आला. हेमाडपंत वाचनालय, समाधि-मंदिर, द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान, लेंडीबाग, श्रीखंडोबा मंदिर, साईनाथ रुग्णालय इ. स्थाने पाहून पत्रकार बंधू–भगिनींना संतोष वाटला.

रविवारी सकाळी पत्रकार व संस्थान अधिकारी यांचा परस्पर परिचयभेटीचा आनंददायक सोहळा पार पडला. याप्रसंगी मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत पुरंदरे, चिटणीस श्री. यशवंत मोने, संयुक्त कार्यवाह श्री. प्रकाश कुलकर्णी, महाराष्ट्र राज्याचे माजी प्रसिद्धी संचालक श्री. दा. रा. सामंत यांचा श्री. पाठक साहेबांच्या हस्ते पुष्पहार व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी सुरुवातीस श्रीसाईलीलाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांनी प्रास्ताविक स्वागतपर भाषण केले. परिचय कार्यक्रमानंतर संस्थानचे ऑफिस सुपरिंटेंडेंट श्री. एस. बी. गोडखिंडी यांनी संस्थानबद्दलची व कारभाराची साद्यंत हकीकत सांगितली. श्री. व्ही. व्ही. नागवे, समाधीमंदिर व्यवस्थापक यांनी संस्थानतर्फे व श्री. यशवंत मोने यांनी पत्रकारांचे तर्फे आभार–प्रदर्शन केले.

शिर्डीस आलेल्या पत्रकारबंधूत श्री. चंद्रकांत पुरंदरे सौ. पुरंदरे, श्री. यशवंत मोने, सौ. मोने, श्री. प्रकाश कुलकर्णी श्री. व सौ. दा. रा. सामंत, श्री. व सौ. अ. सी. केळुस्कर, श्री. व सौ. रमेश भोगटे, श्री. व सौ. गो. शं. हुजूरबाजार, श्री. व सौ. दामले, श्री. व सौ. नारायण पेडणेकर, श्री. व सौ. भालचंद्र दिवे, श्री. व सौ. जोग, श्री. व सौ. य. ल. सांभारे, श्री. शांताराम गोठोसकर, श्री. सकपाळ, सौ. टिकेकर, श्री. दाजीसाहेब सापळे, श्रीमती मायाताई चिटणीस, श्री. चिटणीस, श्री. व सौ. प्रकाश रायकर, सौ. सुधा रायकर, इ. चा समावेश होता.

रविवारी दुपारी १२ वा. ही सर्व मंडळी शिर्डीहून मुंबईस परतली.

# मुंबई मराठी पत्रकार संघाची शिरडीस भेट

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे कोर्ट रिसिव्हर साहेब श्री. का. सी. पाठक यांनी शिरडी भेटीचे दिलेल्या आमंत्रणाचा स्वीकार करून मुंबई मराठी पत्रकार संघाने शनिवार-रविवार १४ व १५ जानेवारी १९७८ रोजी शिरडीस सहकुटुंब भेट दिली.

शनिवार दि. १४ रोजी मकरसंक्रांतीस पहाटे ६ वाजता सुमारे ८० वर मंडळी शिरडीस लक्झरी बसेसनी येऊन थडकली. त्यांचा निवास, स्नान, चहापान, भोजन इ. ची सर्व व्यवस्था संस्थानने नव्या शांती निवास इमारतीत २० खोल्यातून केली होती. सकाळची सर्व ती नित्यनैमित्तिक कामे आटोपल्यावर मंडळी सकाळी १० वा. साकोरीस श्रीसती गोदावरी मातार्जींच्या दर्शनास गेली. तिथे डॉ. शांताराम टिपणीस, व्यवस्थापक यांनी सर्वांचे स्वागत करून श्रीउपासनी कन्याकुमारी आश्रमाचा परिसर दाखविला श्रीमाताजींनी त्यांना दर्शन देऊन सर्वांना स्वहस्ते प्रसाद दिला. नंतर मंडळी दुपारच्या आरतीस शिरडीस परतली व बाबांच्या प्रसाद ग्रहणानंतर त्यांना शिर्डी संस्थानचा संपूर्ण परिसर दाखविण्यात आला. हेमाडपंत वाचनालय, समाधि-मंदिर, द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान, लेंडीबाग, श्रीखंडोबा मंदिर, साईनाथ रुग्णालय इ. स्थाने पाहून पत्रकार बंधू-भगिनींना संतोष वाटला.

रविवारी सकाळी पत्रकार व संस्थान अधिकारी यांचा परस्पर परिचयभेटीचा आनंददायक सोहळा पार पडला. याप्रसंगी मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत पुरंदरे, चिटणीस श्री. यशवंत मोने, संयुक्त कार्यवाह श्री. प्रकाश कुलकर्णी, महाराष्ट्र राज्याचे माजी प्रसिद्धी संचालक श्री. दा. रा. सामंत यांचा श्री. पाठक साहेबांच्या हस्ते पुष्पहार व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी सुरुवातीस श्रीसाईलीलाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांनी प्रास्ताविक स्वागतपर भाषण केले. परिचय कार्यक्रमानंतर संस्थानचे ऑफिस सुपरिंटेंडेंट श्री. एस. बी. गोडखिंडी यांनी संस्थानबद्दलची व कारभाराची साद्यंत हकीकत सांगितली. श्री. व्ही. व्ही. नागवे, समाधीमंदिर व्यवस्थापक यांनी संस्थानतर्फे व श्री. यशवंत मोने यांनी पत्रकारांचे तर्फे आभार-प्रदर्शन केले.

शिर्डीस आलेल्या पत्रकारबंधूत श्री. चंद्रकांत पुरंदरे सौ. पुरंदरे, श्री. यशवंत मोने, सौ. मोने, श्री. प्रकाश कुलकर्णी श्री. व सौ. दा. रा. सामंत, श्री. व सौ. अ. सी. केळुस्कर, श्री. व सौ. रमेश भोगटे, श्री. व सौ. गो. शं. हुजूरबाजार, श्री. व सौ. दामले, श्री. व सौ. नारायण पेडणेकर, श्री. व सौ. भालचंद्र दिघे, श्री. व सौ. जोग, श्री. व सौ. य. ल. सांभारे, श्री. शांताराम गोठोसकर, श्री. सकपाळ, सौ. टिकेकर, श्री. दाजीसाहेब सापळे, श्रीमती मायाताई चिटणीस, श्री. चिटणीस, श्री. व सौ. प्रकाश रायकर, सौ. सुधा रायकर, इ. चा समावेश होता.

रविवारी दुपारी १२ वा. ही सर्व मंडळी शिर्डीहून मुंबईस परतली. ●

# शिरडी–वृत्त माहे डिसेंबर सन १९७७

या महिन्यात श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी फारच होती. नाताळची सुट्टी व सहलीमुळे यात्रेचे स्वरूप आले होते. काही कलाकारांनी श्रींचेपुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :–

**कीर्तन :–** १) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी, शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली.

**प्रवचन :–** १) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिरडी, यांचे प्रवचन झाले.

**गायन, भजन, वादन** १) श्री. द्वारकानाथ हजारे, डोंबिवली, २) श्री. श्रीराम उध्दव गोडबोले, मुंबई, ३) कु. अरुंधती करंदीकर, ४) सौ. वसुंधरा करंदीकर, मुंबई, ५) श्री. जयवंत कुलकर्णी, मुंबई, ६) श्री. अनंत पांचाळ, मुंबई, ७) श्री. मुकुंद रा. महाडिक, मुंबई, ८) श्री. सुहास मं. गुंझीकर, नासिक, ९) श्री. अनंत दा. शिरसवडे, विंचूर, १०) श्री. अशोकराव जाधव, विंचूर, ११) श्री. विश्वास वि. कांवळी, मुंबई, १२) श्री. अनंत ध. गायकवाड, ठाणे, १३) श्री. के. बी. रमणमूर्ति, विशाखापट्टनम्, १४) सौ. सुधा सु. चापनेरकर, अहमदाबाद, १५) सौ. मीना वि. रेळे, मुंबई, १६) श्री. मधुकर द. बेलसरे, मुंबई, १७) श्री. सुनील पो. घमले, कोपरगाव, १८) श्री. अनंतराव आढाव, कोपरगाव, १९) श्री. एम. व्ही. तथा बंडोपंत सोलापूरकर, पुणे, २०) श्री. बाजीराव सोनवणे, पुणे, २१) श्री. रमाकांत सोनवणे, पुणे, २२) श्री. चिंतामणी सोलापूरकर, पुणे, २३) श्री. शंकर सोलापूरकर, पुणे, २४) श्री. नारायणबाबा व भजन पार्टी, मुंबई.

**श्रीदत्तजयंती :–** सायंकाळी ४-३० ते ६ वाजेपर्यंत संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांचे कीर्तन झाले. दत्तजन्म कार्यक्रम झाल्यावर धूपारती झाली व सर्वांना तीर्थप्रसाद वाटणेत आला. रात्री ७-३० ते ९-०० व ९-३० ते ११ वाजेपर्यंत श्री. श्रीराम गोडबोले मुंबई यांचे गायन झाले. ९-१५ ते ११-३० पर्यंत श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली. दुसरे दिवशी श्री. बंडोपंत सोलापूरकर व पार्टी पुणे यांचा क्लोरेनेट, सनईवादन कार्यक्रम झाला. अशा थाटात दत्तजयंती उत्सव पार पडला.

**माननीयांच्या भेटी :—**

१) मा. श्री. जितकर, जिल्हाधिकारी अहमदनगर.

२) मा. श्री. अफझलपूरकर, जिल्हाधिकारी पुणे.

३) मा. श्री. सेठ, असि. कमिशनर, अॅ. क. ब्युरो पुणे.

४) मा. श्री. एकनाथराव निंबाळकर, राज्यमंत्री मध्य व मोठे पाटबंधारे महाराष्ट्र मुंबई.

५) मा. श्री. बी. सी. गाडगीळ, न्यायाधीश, उच्चन्यायालय मुंबई.
६) मा. निरगुडे, धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य.
७) मा. श्री. देशपांडे, लेखासंचालक महाराष्ट्र मुंबई.
८) मा. श्री. पी. बी. सावंत, न्यायाधीश उच्च न्यायालय मुंबई.
९) मा. श्री. धारकर, कायदामंत्री मध्यप्रदेश.

**हवापाणी** :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटे थंडी असते.


## श्रीसाईलीला – वर्ष ५७ वे

### नूतन वर्षाचा पहिला अंक

## खास उदी अंक

### एप्रिल १९७८ मध्ये प्रसिद्ध होणार

श्रीबाबांच्या धुनीमाईतील उदी म्हणजे काय ? थोरामोठ्यांनी कथन केलेले तिचे महत्त्व, तिचे आश्चर्यकारक अनुभव, उदी आणि रोगोपचार इ. इ. नी भरगच्च असा अगदी प्रथमच या विषयावर जगात प्रकाशित होणारा संग्राह्य अंक.

## बच्चोंके साईबाबा

### मुलांचे साईबाबाचा सुरस हिन्दी अनुवाद

* सदानंद चेंदवणकर, का. संपादक **श्रीसाईलीला**

पहिली आवृत्ती तीन महिन्यात खलास !

दुसऱ्या मोहक आवृत्तीची छपाई सुरू झाली.

मुखपृष्ठावर श्रीबाबांचे चित्ताकर्षक संग्राह्य चित्र

# श्रीसाई प्रसन्न

श्रीसाईनाथ बाबा हे, साईनाथ बाबा
आशिर्वाद द्या क्षणभरी तिथेच थांबा ॥ धृ० ॥

मी आहे अज्ञानी पामर,
तु सदा दयेचा सागर ।
नम्रभावे मी वंदीतो तुला,
सद्‌बुद्धी तु दे मजला ॥ १ ॥
साईनाथ हे बाबा हे, साईनाथ बाबा० —

शरण प्रभु तुज पाशी आले,
तुझ्या आशिर्वादा मी मुकेली झाले ।
नाना चमत्कार तुझे मी ऐकीले,
म्हणुन तुझ्या दर्शनाला मन अधीर झाले ॥ २ ॥
साईनाथ बाबा हे साईनाथ बाबा०—

आस मनाला तुझी लागली,
तुझ्या दर्शनाची घाई मज झाली ।
भक्त तुझी मी कशी म्हणुरे,
अजूनी दर्शन नाही तुझे घडले रे ॥ ३ ॥
साईनाथ बाबा हे साईनाथ बाबा० —

–सौ. मंदा खापरे
मधुशिल्प को. हौ. सोसायटी
डोंबिवली (पूर्व)

# अशी भेटे मुक्तिवाट !

अेके दिसी सपनात, शिरडीचा साई भेटे ।
म्हणे माग जे जे लागे, जे जे तुजलाही वाटे ॥

सोनं नको चांदी नको, मोटर बंगला माडी नको ।
फक्त अक्कल दे थोडी, मान तुझ्या पायी झुको ॥

रस्त्यामंदी काटंकुटं ! सुख कमी दुःख मोठं ।
अशा जगात बिकट, कशी कापावी रं वाट ॥

थांस डोळे मग त्याने उलिसेक हासविले ।
गोड शब्द मायेचे उमटती वळे वळे ॥

" साखरेचे कणे कणे, जैसे मुंगी जोडे गोडी ।
तैसी नित्यकरमात पुण्य जोड थोडी थोडी ॥ "

" थोडे थोडे पुण्य अैसे दाविसील मुक्तिवाट ।
नष्ट होसी आपोआप रस्त्यातील काटंकुटं ॥ "

— श्री. दिलीप दत्तात्रय जोशी,
कामठी, जि. नागपूर

# साईमंदिरी फुलबाग

लाविली कुणी साईमंदिरी ही फुलबाग

कुणी फुलविला मोगरा,
कुणी घातीला मांडव, जाई-जुई चमेलीचा
कुणी शेवंतीला साज पिवळा दिला शांतीचा
कुणी गुलाबाला सुगंध दिला प्रितीचा

कुणी बकुळ मालती लावीली दारी
कुणी फणस अंबा, काजुची गरी
या विश्वाची बाग फुलविली
लावुनी येथे तुळस मंजीरी

येथे बेल दुर्वा कोणी वाहिल्या
येथे कोणी वाहिला निशीगंध
केला समर्पण भाव जिवाचा
अर्पूनी स्वर्गीचा अमोल हा पारिजात,

– सौ. कलावती वसंतराव चव्हाण
अंबाबाई मिस्त्री निवास बी/६
सेनापती बापट मार्ग दादर, मुंबई २८.

# अजब शिरडी दरबार

साधुसंत सर्व । तुला विनविती ।
अज्ञान भोळे सर्व । भाविक धुंडती ।
वन वन हिंडुनी । जग सारे थकले ।
तु भेट कधी देणार । अजब तुझा दरबार ।

धुंडुनी हिंडूनी । जग सारे थकले ।
डोळे असता लोक । झाले आंधळे ।
तुझे भेटी विना । जीवन सुकेले ।
तु भेट कधी देणार । अजब तुझा दरबार ।

जिकडे जावे तिकडे वाटा ।
गुरू नसता करीतो परमार्थ ।
त्याचा भाव सारा खोटा ।
तु भेट कधी देणार । अजब तुझा दरबार ।

अज्ञानी भक्ती । सारे आम्ही अडाणी ।
करावी गुरुकृपा बाबा । नाव आमची तारावी ।
खोटा आहे हा संसार बाबा ।
तु भेट कधी देणार । अजब तुझा दरबार ।

– श्री. एस. एस. स्वामी धरणीकर,
ता. अहमदपूर, जि. उस्मानाबाद.

## "सद्गुरु कृपा"

ईशकृपेने सत्संग लाभतो
सत्संगतीने सत्पुरुष भेटतो
सत्पुरुषाच्या सहवासे
अनंत जन्म भोग तुटतो.
भोग सरता भाग्य उजळते
सौभाग्यानें पुण्य फळते
पुण्यकाळीं ईशदर्शन
मी तू पणाचें बंध गळते.
स्व–स्वरूपाला आकळता
स्वानंदाचा महापूर
हे मोक्षाचें द्वार खुले
मिळतां सद्गुरू कृपावर

## "मुक्त"

अवतारी पुरुष मुक्त सदा
पुनःदर्शन देई अनेकदा
भक्तीभावे वंदावे गुरूचरण
निःशंक जाण जन्मकल्याण
कर्मभोग ना चुकती
लाभे गुरूसेवा फळ
अगाध तो महिमा
दुर्भाग्य होई निष्फळ
मूढ जीवा, धरी सद्गुरु पद
चिंतवणी नासे
गुरूदेव सच्चिद्ध !

– शशिकला साळगांवकर
मुक्तानिवास, १५५ ब,
नवीपेठ, सोलापूर

# कृपावंत साई

साई कृपावंत साई
भक्तांची तू थोर आई ॥ धृ ॥
जनकल्याणाचे व्रत
घेवूनी आला भूप्रत
जे पिडित अंधारात
त्यांना तू प्रकाशदायी ॥ १ ॥
वाली गोरगरिबांचा
तुझविण नाही साचा
दुबळ्या अन् लाचारांचा
खरा आधार तू साई ॥ २ ॥
हिशेब पापपुण्याचा
नाही केला कधी साचा
दावी मला तू मुक्तीचा
सन्मार्ग हे कृपामाई ॥ ३ ॥
सुखकर्ता दुखहर्ता
तूच असे आम्हा नाथा
कष्टाळू आमच्या हाता
तुझीच असे पुण्याई ॥ ४ ॥

– एम्. के. गुम्मलवार
विणकर कॉलनी, नांदेड.

# ॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

करूणा निधान साईनाथा ।
तव पदी जन-रत होती सदा ।
आशिष मिळती सदा ।
सुलभ सत्वे तुझी । मनोभाव हाचि मूलमंत्र
तव ध्यान करिता मनो भावे ।
धावूनि येशी भक्ता लागी ।
करुणा निधान साईनाथा ॥

– पद्मावती के. चिटणवीस
शंकर-निवास छिंदवाडा रोड, नागपूर

# चला ! चला !! साईनाथाचे दर्शनाला !

चला ! चला !! साईनाथाचे दर्शनाला।
साईनाथाचे दर्शनाला ! दर्शनाला !! दर्शनाऽऽला।
चला ! चला !! साईनाथाचे दर्शनाला ! ॥ धृ ॥

१

घेता साईनाथ नाम।
हेचि असे मुक्ति-धाम।
चिरंतन सुख-विश्राम।
गोकुळीचा घनःशाम।
साईनाथ लावेल नाव किनाऱ्याला।
चला ! चला !! साईनाथाचे दर्शनाला।

२

साई सुखाचे आगर।
साई कृपेचा सागर।
दुःखितांना हा आधार।
साईनाथ पृथ्वीवर।
दुःखितांची लाविसी नाव किनाऱ्याला।
चला ! चला !! साईनाथाचे दर्शनाला।

३

भजा साई निरंतर।
परब्रह्म हे साकार।
साई कृपेचा आधार।
रजःकण 'गंगाधर'।
ठेवी माथा विमल साई चरणाला।
चला ! चला !! साईनाथाचे दर्शनाला।

—श्री. गं. म. जाधव
E. W. S. क्वार्टर्स, क्रमांक-६०,
रघुजी नगर नागपूर-पिन ४४०००९

# श्रीसाई महिमा

तुझ्या स्मरणाने साई, मन मोहोरूनी जाते
तुझ्या दर्शनाने साई, निराशा नष्ट होते । ॥ १ ॥

भक्तांच्या कल्याणार्थ देवा, रूप भूलोकी घेतले
भाव भक्तीचे, मनात चमत्कारानी तू निर्मिले । ॥ २ ॥

आम्हा सर्वां भक्तांचे हृदयी, साई तुझाच संचार
तुझ्याच वचनांनी साई, सदैव मिळतो आम्हा आधार । ॥ ३ ॥

तुला शरण आलेल्याचे साई, नाव लौकीक वाढते
कितीही तो दुःखी असो, दुःख समुळ नष्ट होते । ॥ ४ ॥

तुझ्या चरित्र वाचनाने साई, भाव भोळा जागतो
तुझ्या चरणी माथा ठेवल्याने, दृढ विश्वास वाटतो । ॥ ५ ॥

साई, व्यावहारिक या जगात जरि व्यर्थ अपमान झाला
दृढ श्रद्धेने साई-साई जपता, नेतो तू विलयाला । ॥ ६ ॥

"रखा श्रद्धा व सबुरी," हा आपुलाच मंत्र महान
सदैव पाठीसी राहून, आपणच करिता भक्तांचे कल्याण । ॥ ७ ॥

तन-मन-धन सर्व साई, तुम्हास अर्पिते
एकदा साक्षात रूप दावून साई धन्य करा लेकुराते । ॥ ८ ॥

— कु. शालिनी सदाशिव देशपांडे
११ रामदास कॉलनी जळगांव

# श्री शिर्डीके साईबाबा प्रसन्न।

काय रंगलाय रंग महालात
काय ठेवलय या संसारात
जरा ठेवा भाऊ ध्यानात
जा रंगुनि साई रंगात
काय रंगलाय रंग महालात

काय वर्णावी रे साईलीला
टाका कायेत रोहिणि निला
विविध रंगानी नटवी पृथ्वीला
वेळ घाला थोडा चिंतनात
काय रंगलाय रंग महालात।

कर थोडा तरी विचार
का तूं निर्मीला हा संसार
माया साईची अपरंपार
स्मरूनि पहा थोडे मनात
काय रंगलाय रंग महालात।

उभा संसार करतो जाप
तोच आई अन् तोच बाप
कां सोसीतो संसाराचा ताप
शोध जगावेगळा या जगात
काय रंगलाय रंग महालात।

— अरुणकुमार बी. सोनवणे शिरपूर
प्रो. भाग्यवान पान कंपनी, विजयस्तंभाजवळ शिरपूर
मु. पो. ता. शिरपूर जि. धुळे (महाराष्ट्र)

# वरदान

अन्य नको वरदान । साई मज अन्य नको वरदान ।
तुझ्या कृपेच्या पंखावरही विसावली मम मान ।
साई मज अन्य नको वरदान ।। ध्रु. ।।

शरणांगत जो तुजला नमितो ।
कृतान्त काळ हो त्याला भितो ।
तुझिया द्वारी कुणी न श्रमतो ।
स्फुरते मनाला सदैव प्रभुरे तुझेच यशोगान ।
साई मज अन्य नको वरदान ।। १ ।।

शिर्डी क्षेत्री मज नई झडकरी ।
पाहु दे तव मूर्ती मनोहरी ।
भावऊर्मी या उसळती मम अंतरी ।
कळस पाहुनी हरपे बघ रे माझे देहभान ।
साई मज अन्य नको वरदान ।। २ ।।

द्वारीवती ही मशिदमाई ।
दीन दुबळ्यांची होऊनी आई ।
करिते रक्षण ठायी ठायी ।
महिमा श्रवुनी धन्य होती मम कान ।
साई मज अन्य नको वरदान ।। ३ ।।

सौ. अस्मिता कमलाकर दांडेकर
६९ बी. खाडीलकर रोड
गिरगाव, मुंबई ४.

# श्रीसाईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

## श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | रु. पै. |
|---|---|
| (१) श्रीसाई सच्चरित्र, (मराठी) | १५–०० |
| (२) श्रीसाई सच्चरित्र, (इंग्रजी) | ६–२५ |
| (३) श्रीसाई सच्चरित्र, (गुजराती) | ६–५० |
| (४) श्रीसाई सच्चरित्र, (हिन्दी) | ७–२५ |
| (५) श्रीसाई सच्चरित्र, (कानडी) | ४–२५ |
| (६) श्रीसाई सच्चरित्र, (सिंधी) | १०–०० |
| (७) गुजराती पोथी (शरणानंद) | ५–५० |
| (८) श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (मराठी) | ०–२० |
| (९) श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (गुजराती) | ०–३० |
| (१०) दासगणूकृत ४ अध्याय, (मराठी) | ०–२५ |
| (११) सगुणोपासना, (मराठी) | ०–२५ |
| (१२) सगुणोपासना, (गुजराती) | ०–२० |
| (१३) श्रीप्रधानकृत चरित्र, (इंग्रजी) | २–०० |
| (१४) साईलीलामृत, (मराठी) | ४–७५ |
| (१५) सचित्र साईबाबा, (चित्रमय संग्रह) | २–०० |
| (१६) साईबाबा अवतारकार्य, (अ. य. धोंड) | २–५० |
| (१७) शिर्डीचे श्रीसाईबाबा, (के. भ. गव्हाणकर) | ५–०० |
| (१८) शिर्डी दर्शन (६६ चित्रांचा संग्रह) | २–०० |
| (१९) मुलांचे साईबाबा, (मराठी) | ०–७५ |
| (२०) मुलांचे साईबाबा, (गुजराथी) | १–०० |
| (२१) चिल्ड्रेन्स साईबाबा, (इंग्रजी) | १–२५ |
| (२२) मुलांचे साईबाबा (तेलगु) | १–५० |
| (२३) बच्चोंके साईबाबा ( हिंदी ) स. चंदवणकर | ०–७५ |
| (२४) साई किर्तनमाला, (मराठी) | २–२५ |
| (२५) साई दी सुपरमन, ले. स्वामी साई शरणानंद, (इंग्रजी) | ३–२५ |
| (२६) श्रीसाई रूद्राध्याय, (मराठी) | ०–०५ |
| (२७) श्रीसाई गीतांजली, (मराठी) | ०–०५ |
| (२८) गाईड टु शिर्डी, (इंग्रजी) | ०–१० |
| (२९) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र, ( मराठी व इंग्रजी ) | |
| वार्षिक वर्गणी, | ६–०० |
| प्रत्येक प्रत | ०–६० |

Regd. NO. MH/BYE/


# साईबाबा धर्मार्थ दवाखाना

( होमिओपाथिक )

## सर्व धर्मियांकरिता खुले

कृपया या संधीचा जरूर लाभ घ्यावा.

वेळ : रोज सकाळी १०-३० ते १२-३० सायंकाळी ४-३० ते ६-३०

रविवार व काही विशिष्ट सुट्टीचे दिवस सोडून

आकार : दर दिवसास २५ पैसे

नवीन पेशंटसाठी ५० पैसे नोंदणी फी आकारली जाईल.

स्त्रियांसाठी खास स्त्री डॉक्टरांची सोय

## साईबाबा धर्मार्थ दवाखाना

(शामदासानी फौंडेशन)

नवजीवन हौसिंग सोसायटी,

ब्लॉक नं. ३, रूम १०४,

लॅमिंग्टन रोड, मुंबई ४००००८


मुद्रक : पांडुरंग मोरे, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर रोड वडाळा, मुंबई-३१. संपादक व प्रकाशक : श्री. का. सी. पाठक, 'साई निकेतन डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई-१४.